म. ग्रं. सं. ठाणें
विषय —
सं. नं.

# महान

## मनुष्यजातीचा संरक्षक !

REFBK-0005589

कथा-माला,
पोडी, पुणे नं० ३.

सहाय्यक:—श्री० पोपटलाल रामचंद शहा.

REFBK-0005589

# -विनंति विशेष-

हिंदुस्थानच्या हिताकरिता हिंदुस्थानमध्यें सार्वजनिक कार्य करणे महा कठीण कर्म झाले आहे. ज्याला जे वाटेल, ते त्याने करावे आणि "रिकाम-पणाची कामगिरी" म्हणून 'होयबा' बुद्धीच्या चळवळींत पडल्याने ज्याचा थोडा-बहुत स्वार्थ साधण्यासारखा असेल असल्या-वृत्तीच्या लोकानी त्याला उचलून धरावे, त्याच्या कार्याला नेट द्यावा-मग त्यापासून काही का फायदा नसेना-असला कारभार हरहमेश पाहण्यास मिळत आहे. निरपेक्ष बुद्धीने, खऱ्या कार्यकर्त्याने केलेले कार्य मात्र व्यर्थ जात आहे.

आजपर्यंतच्या अनुभवावरून पहाता गेल्या २-२॥ हजार वर्षांत, केवळ भारतवर्षालाच नव्हे तर संपूर्ण जगाला-आपल्या कार्यक्रमाने-हलवून सोडणारा 'महान' पुरुष म. गांधीसारखा कोणीही झाला नाही. आणि त्यांचे सार्वजनिक कार्य म्हणजेसुद्धा हिंदुस्थानच्या स्वराज्यासंबंधीचे; हिंदुस्था-नच्या स्वातंत्र्यासंबंधीचेच! पण, ते साधण्याचा प्रयत्न करीत असताना महारा-ष्ट्रासारख्या हिमालयाएवढ्या अडीअड वर्णांचा विरोध त्याना सहन करावा लागत आहे, 'गांधी म्हणजे फंडगुंडांचे महाराज' असला क्षुद्र आरोप सोसावा लागत आहे, विरोधीमतांच्या सैतानाकडून हरघडी 'नाउमेदी' ची मात्रा गोड तोंडाने घोटावी लागत आहे. परंतु तसलेही 'हालाहल' पचवून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे कार्य 'महान' पुरुष म. गांधी करीतच आहेत. म. गांधींची जिथे ही स्थिति, तिथे इतरांची मात्रा काय चालणार आहे! चालणे कठीणच आहे.

हिंदुस्थानची लोकसंख्या बहुत काळ तीस कोटींपेक्षा अधिक आहे. ज्या देशाला ज्या लोकांचे नाव लावण्यात येते तो देश त्या लोकांच्याच संख्येने अधिक समृद्ध असला पाहिजे. अर्थात हिंदुस्थानात सर्वपरी एका हिंदुचीच समृद्धी पाहिजे. आज हिंदुस्थानची लोकसंख्या पस्तीस कोटीच्या वर आहे. पण हे सारे हिंदुच आहेत काय? नाहीत. पारशी, ख्रिश्चन, युरोपियन, मुस-

मुसलमानादि सर्वच यात येतात. मग प्रत्यक्ष हिंदुस्थानात हिंदु आहेत तरी किती ! आणि मोठ्या जातींचे दुसरे गट कोणते ? १९३१ साली झालेल्या जगावरील लोकसंख्येच्या ' खानेसुमारी ' बरोबर हिंदुस्थानच्या खानेसुमारीने पुढीलप्रमाणे निर्णय दिला आहे:

| | | | |
|---|---|---|---|
| हिंदु सर्वसाधारण | ... | ... | १८७५४१२२३ |
| ,, अस्पृश्य | ... | ... | ५१६५३९१७ |
| ,, बौद्ध | ... | ... | १२७८६८०६ |
| ,, जैन | ... | ... | १२५२१०५ |
| एकंदर=हिंदु | ... | ... | २५३२३४०५१ |
| मुसलमान | ... | ... | ७७६७७५४५ |
| युरोपिअन | ... | .... | १६८१३४ |
| अँग्लो–इंडियन | ... | ... | १३८३९५ |
| पारशी | ... | .... | १०९७५२ |
| इतर | .... | .... | २१५०९९०१ |
| एकंदर लोकसंख्या | ... | ... | ३५२८३७७७८ |

म्हणजे एकंदर पस्तीस कोटी, अठ्ठावीस लक्ष, सदतीस हजार, सातशे अठ्याहत्तर हिंदुस्थानची लोकसंख्या. यातून विधर्मीयांची नऊ कोटी, शहाण्णव लक्ष, तीन हजार, सातशे सत्तावीस ( ९९६०३७२७ ) इतकी संख्या वजा केल्यास हिंदू म्हणवून घेणारांची संख्या फक्त पंचवीस कोटी बत्तीस लक्ष, चवतीस हजार, एकावन इतकीच उरते. यातूनही, तीव्र धर्म–पंथ–भेद असणारे म्हणून अस्पृश्य, बौद्ध व जैन यांची एकूण संख्या सहा कोटी, छप्पन लक्ष, ब्याण्णव हजार, आठशे अठ्ठावीस ( ६५६९२८२८ ) हे वजा केल्यास म्हणजे मूळ--फक्त--हिंदूतून वरीलप्रमाणे संख्या कमी करताच शिल्लकः अठरा कोटी, पंचाहत्तर लक्ष, एकेचाळीस हजार, दोनशे तेवीस: येवढेच हिंदू भरतात. यांप्रमाणे उरणाऱ्या हिंदु लोकांमध्येसुद्धा आणखी पोटजातींचे तीव्र बंड माजून राहिल्यामुळे कोणाचा पायपोस कोणाच्या पायात राहिला नाही.

प्रत (३) २१/८/१३ ७५८९

(ब्राह्मण–ब्राह्मणेतर–वादांमुळे, जातीपुरते हित–संघटन करणारे म्हणून आम्हेच निराळे काढा असे ठरले तर हिंदुंची लोकसंख्या आणखी दहा अकरा लाखांनी कमी होईल.)

आणि, या स्थितीमुळेच गेल्या हजार–बाराशे वर्षांत संपूर्ण हिंदुस्थान, संपूर्ण भारतवर्ष परतंत्र, दुसऱ्यांचा ताबेदार, गुलाम बनला आणि गुलाम अनूनच्या बनून शिवाय आपली लोकसंख्याही त्याने कमी करून घेतली. हिंदुस्थानची लोकसंख्या बाटल्यामुळे, बाटविली गेल्यामुळे किंवा त्यानी, परक्या धर्माचा स्वीकार केल्यामुळे, तसा स्वीकार करावा लागल्यामुळे मूळ हिंदुंची लोकसंख्या निम्मानिम घटली.

तेव्हां, यापुढे तरी असे काही विचित्र व्हावयास नको असेल तर 'हिंदु तेवढे एक' अशी स्थिति झाली पाहिजे. महात्मा जोतिराव फुले, गुरुवर्य विठ्ठल रामजी शिंदे, लोकप्रिय केशवराव जेधे यांच्या प्रयत्नाप्रमाणेच डॉ. भीमराव रामजी आंबेडकर व सध्याचे युगपुरुष, 'महान' पुरुष म० गांधी यानी 'अस्पृश्यतानिवारणा'चा प्रयत्न चालविला आहे. 'हिंदुतून गेले त्यांचा नंतर विचार करता येईल, पण आहेत त्यांचा आजच योग्य विचार केला पाहिजे' या नात्याने मंदीर–प्रवेश–सत्याग्रह, सहशिक्षण, बोर्डिंगे, सभा–संमेलने, सहभोजने, संयुक्त मतदार–संघ, विस्तृत मतदार–संघ उरोषणेआदि अनेक प्रकाराने चळवळी चालू आहेत. यापूर्वी बऱ्याच झाल्या. विधर्मीयानीही 'अस्पृश्यता–निवारण' या हिंदुंच्या चळवळीचा प्रसंग साधून आपल्या धर्मविस्ताराच्या दृष्टीने फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला. आता तर तो त्यांचा प्रयत्न अगदी निकरावर आला आहे. याचे उघडाउघड कारण म्हणजे डॉ० आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा!

अशा रितीने नानाप्रकारच्या चळवळी देशामध्ये चालू असता प्रस्तुत लेखकासही चालू घडी आयुष्याचा समाजसेवेकारणी व्यय करण्याची इच्छा होऊन त्यानेही आपल्या कल्पनेप्रमाणे एक मार्ग ठरविला.

'कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी, साधण्यापूर्वी उगाच वाच्यता नको, लोकांनी आपणाला खिजवावे असा विषय उगाच व्हावयास नको' म्हणून स्वभावधर्माप्रमाणे प्रस्तुत लेखकाने 'अस्पृश्यता–निवारणा'चे कार्य हे खिस्ती मिशनरीप्रमाणेच व्हावयास पाहिजे हे आजपर्यंत बोलून दाखविले नाही. परंतु, आतापर्यंतच्या अनुभवावरून–थोरामोठ्यांच्या विचारावरून–तसल्याच कार्याची आज फार मोठी गरज आहे, हे खास दिसून आले आहे.

आणि या गोष्टीकरिता देशभर ठिकठिकाणी खिस्ती–मिशनाप्रमाणे संस्था व मिशनऱ्याप्रमाणे कार्यकर्ते पाहिजेत. खिस्ती–मिशनरी–पाद्री ज्याप्रमाणे या देशाशी आपला अर्थाअर्थी काही संबंध नसताना ( केवळ आपला धर्म वाढवावा म्हणून ! ) मनुष्यजातीच्या उद्धाराचे कार्य करीत असतो, त्याचप्रमाणे हिंदूंच्या संरक्षणासाठी, त्यांच्या हितसंबंधासाठी व्यक्तिपुरते कार्य करावयाचे प्रस्तुत लेखकाने ठरविले. ज्या समाजाचे आपणास काम करावयाचे आहे. त्या समाजाची अंतर्बाह्य माहिती असणे अवश्य असल्यामुळे अस्पृश्य–समाजात स्वतःच शिरकाव करून घेण्यासाठी प्रथमतः स्वतःचा मिश्रविवाह करून घेतला आणि आज आठ–नऊ वर्षांत सार्वजनिक काम करता करताच त्यांच्याशी पूर्ण तादात्मता मिळविली.

हिंदुसंघटनासाठी, हिंदुसंरक्षणासाठी हिंदुसंवर्धनासाठी, 'अस्पृश्यता–निवारण' झालेच पाहिजे या बाबतीत प्रस्तुत लेखकाने आठ वर्षांपूर्वी एक छोटीशी शब्द--कल्पना लिहून काढून त्यावर प्रसिद्ध कार्यकर्त्या पुढाऱ्यांचे स्वहस्ते अभिप्राय घेतले. ती शब्द–कल्पना व अभिप्राय शेवटी दिले आहेत. ते एकवेळ प्रत्येकाने अवश्य वाचावे अशी आग्रहाची विनंति आहे. असो.

सुरवातीला म्हटल्याप्रमाणे 'हिंदुस्थानात हिंदुंच्या हिताकरिता सार्वजनिक कार्य करणे हे महा कठीण कर्म आहे' हे अगदी सत्य आहे. कारण, जो तो स्वतःपुरते, स्वतःच्या सुखापुरते, स्वतःच्या समाधानापुरते, फार काय स्वतःच्या संसारापुरतेच पहात असल्यामुळे 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा' याचा कोणी विचारसुद्धा करीत नाही.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी 'काँग्रेस' चळवळ करीत आहे. 'हिंदुसंघटन' हेच काँग्रेसचे बळ आहे आणि 'अस्पृश्यता–निवारण' हा हिंदुसंघटनाचा मुख्य आत्मभाग आहे. हे सर्व सार्वजनिक काम आहे आणि सार्वजनिक काम म्हटले की त्याला 'फंडा'ची गरज लागणारच! पण हे लक्षात न घेता जो तो मुख्य कार्यकर्त्याला 'दोषार्ह' ठरविण्याचा आणि पर्यायाने त्याची चळवळ, त्याचे सेवाकार्य हाणून पाडण्याचा प्रयत्न करीत आहे.



सौ. लक्ष्मीबाई उपासक व
चि. दया उपासक

तेव्हा, 'फंड' म्हणून फुकट नको, दान म्हणून तर नकोच नको, पण मेहेरबानी म्हणून–मोबदला घेऊन मदत करण्यास काही हरकत नाही–ख्रिस्ति–मिशनऱ्यांच्या पद्धतीवर 'अस्पृश्यता–निवारणा'चे कार्य म्हणूनच 'महाराष्ट्र–विद्याशाळा' ही संस्था चालविण्यात येत आहे आणि तिच्या मदतीकरिता 'ज्ञान–कथा–माला' ही पुस्तक–प्रकाशन–संस्था काढण्यात आली आहे. पुस्तक–छपाईचा वगैरे खर्च वजा जाता राहणारा सर्व पैन् पै फायदा 'महाराष्ट्र–विद्याशाळे'च्या कार्यार्थच खर्च करण्यात येणार आहे. 'माला' काढण्याचा हेतू लोकांना, योग्य किमतीची नवी नवी आणि आद-

शेवत पुस्तके छापून सादर करण्याचा व त्यातून होणाऱ्या मिळकतीवर 'महाराष्ट्र–विद्याशाळे'चा कार्यक्रम चालविण्याचा मुख्यतः आहे. शाळेची शुद्ध–कल्पना प्रस्तुत पुस्तकाच्या शेवटी दिली असून 'माले' ची स्वतंत्र जाहिरात याच पुस्तकाच्या अखेरीस मलपृष्ठावर दिलेली आहे.

तरी, यावेळी सर्व जनता–जनार्दनाने, 'माले'च्या जाहिरातीत दिलेल्या प्रकारापैकी कोणत्या तरी एका–शक्य त्या–प्रकाराचा स्वीकार करून अस्पृश्यता–निवारणाच्या–'महाराष्ट्र विद्याशाळे'च्या कार्यास उदार मनाने व सढळ हाताने मदत करावी अशी विनंती आहे.

गेल्या काळात निरनिराळ्या कारणाने श्री. शेठ पोपटलाल शहा, श्री. केशवराव जेधे, श्री. गणपतराव (ऊर्फ जी. पी.) पवार, श्रीमती ललिताबाई पवार, पं. लक्ष्मणराव ओगले, श्री. भोगिलाल जैनी, श्री. लक्ष्मणराव भिडे, श्री. धोंडोराम ग. शिर्के, सौ. इंदिराबाई धों. शिर्के, श्री. लक्ष्मण ह. सावंत, सौ. शांताबाई ल. सावंत, श्री. भिवराम भा. गमरे, श्री. पांडुरंगराव राजभोज, श्री. एस्. के. देशमुख इ० हितचिंतक मंडळींनी लेखकाला आजवर फारच मदत केलेली आहे; त्याबद्दल त्यांचे कितीही आभार मानले तरी ते थोडेच होणार आहेत. लेखक त्यांचा ऋणी आहे. त्याचप्रमाणे—

प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईचे काम, लेखकाच्या परिस्थितीकडे पाहून स्वस्त, सुंदर व त्वरीत करून दिले, याबद्दल 'प्रभात प्रिंटिंग वर्क्स'चे मालक व चालक श्री. शेठ शामळदास गुलाबचंद ठार यांचाही लेखक फार आभारी आहे.

शेवटी, ज्या परमात्मशक्तिच्या कृपेमुळे 'ज्ञान–कथा–माले'चे हे 'अर्पण–पुस्तक' तयार झाले, त्याला शतशः प्रणाम करून हे 'विनंती विशेषा'चे लिखाण पुरे करतो.

मंगळवार,<br>१ जून १९३७

सर्वांचा कृपाभिलाषी,<br>**दत्ताराम रंगनाथ उपासक.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
नं.……
नं.……
ता.……
ठाणे

“ १ ”

# “ धर्मामध्ये समुद्र ओलांडून जाण्याची मनाई आहे. ”

बुद्धि ही ईश्वरी देणगी आहे. माणुसकीचा बचाव करण्यासाठी तिचा जास्तीत जास्त उपयोग करणे हा खरा तिचा सदुपयोग! बुद्धीचा सदुपयोग, हे माणुसकीच्या मोठेपणाचे मुख्य लक्षण आहे. जगामध्ये 'महान-पद' प्राप्त होते ते असल्याच सु-लक्षणी बुद्धिमान व्यक्तिमात्राना!

आखून दिलेल्या मार्गाने कोणीही जाईल; आगगाडी हे काम उत्तम करते. परंतु, यात कसल्याही प्रकारची उन्नती नाही.

नीति-अनीति, न्याय्य-अन्याय्य, सत्य-असत्य, चांगले-वाईट; या आणि असल्याच भिन्न भिन्न अवस्था दाखविणाऱ्या शब्दकल्पना, पूर्वकालीन ऋषिमुनिनी त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे 'धर्म' म्हणून प्रतिपादन केल्या! त्या कल्पनाचे पुढे ग्रंथ झाले!! आणि त्या ग्रंथानाच आता धर्म-ग्रंथ म्हणून नाव मिळाले!!!

काळ-वेळ पाहून चालावयाचे म्हटले तर कालचे आज सुधारले पाहिजे आणि आजची सुधारणा पाहून उद्या, बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणे आमूलाग्र बदल सहन केला पाहिजे, अंतर्बाह्य अशी सुधारणा झाली पाहिजे; असा काळ आता येऊन ठेपला आहे. मागील कालात एखादी गोष्ट हितकर ठरली म्हणून, ती उद्याही तशीच ठरेल किंवा तशीच ठरावी म्हणून हट्टाग्रह धरणे, यातच सर्वांचे हित आहे असा दुराग्रह धरणे हे केव्हांही योग्य होणार

५५८९

नाही. काळ व वेळ पाहून चालले पाहिजे आणि त्यांचा योग्य विचारही केला पाहिजे.' धर्माधर्मांचा विनाकारण 'बाऊ' करणाऱ्या आणि जुन्याला 'सोने' मानणाऱ्या हट्टी, दुराग्रही कर्मठांनी, माणुसकीबरोबर देशाचीही अवनती होत आहे याचा चांगला विचार केला पाहिजे; या गोष्टीकडे त्यांनी लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

माणसे, चालती बोलती माणसे, इतकेच नव्हे तर जग सुधारणारी—जगाची जंगलशाही तोडून मोडून साफ करून—जगाचे सौंदर्य वाढवणारी माणसे, काय करणार नाहीत? कल्पनापोच ब्रह्मांडाची उलथापालथ करण्याचे सामर्थ्य मनुष्यमात्रात निःसंशय आहे.

नीति—अनीतिच्या, सत्या—असत्याच्या, न्याय्या—अन्याय्याच्या—विचार केल्याशिवाय—ठरलेल्या—आखून दिलेल्या मार्गाने जाणे यात विशेष काही नाही. हे कोणीही करील. आखून दिलेल्या—मनुष्यानी आपल्या बुद्धिच्या बळावर चालविलेल्या—आगगाडीचे हे काम आहे आणि ते ती उत्तम करीत आहे. आगगाडी चालती बोलती दिसली तरी तिचा 'कर्ता करविता' माणूस आहे. आगगाडीकडून अधिक काही करून घ्यावयाचे असले तर ते तिच्या 'कर्त्या'च्या मर्जीवर अवलंबून आहे. स्वयं अशा शक्तिने ती स्वतःच काही-एक फेरफार करू शकत नाही; करू शकणार नाही. माणसांची तिच्यावरील सत्ता अबाधितच राहणार आहे. आखून दिलेल्या मार्गाने जाण्यात कोणत्याही प्रकारे सुधारणेचे, उद्धाराचे कार्य नाही. हा महान—पदाचा मार्ग नव्हे. हा ईश्वरी प्रसाद तर नव्हेच नव्हे!

स्थिरामध्ये अस्थीरता उत्पन्न करणे, माणुसकी उत्पन्न करणे हे सर्व जगाचे कार्य व जगदीश्वराचे कर्तव्य! सुखाचा, समाधानाचा, उन्नतिचा—कसलाच—विचार न करता एकदा आखून दिलेल्या मार्गाने पुन्हाः पुन्हा जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजे माणसानी आपल्या माणुसकीचा अपमान करण्यासारखे आहे! यात जगाचे कार्य आणि जगदीश्वराचे कर्तव्य यापैकी काहीच नाही.

बुद्धि ही ईश्वरी देणगी आहे आणि तीच जगाच्या उद्धाराकरिता मनुष्यमात्रास चलन देत असते.

जगामध्ये ज्याना 'महान-पद' प्राप्त होते, ते सु-लक्षणी बुद्धिवंत व्यक्तिमात्र, सामान्य जनांच्या दृष्टीने प्रथमतः हट्टी, दुराग्रही असतात, पण खरे तेच सत्याग्रही, तेच खरे महान, तेच खरेखुरे माणुसकीचे संरक्षक असतात! जगाचे, समाजाचे, धर्माचे तेच मार्गदर्शक असतात!! प्राणिमात्रांच्या उद्धाराचा खरा मार्ग त्यांच्यापासूनच चालू झालेला असतो!!!

पुढील शिक्षणाकरिता विलायतेच्या मार्गाला लागण्यापूर्वी मोहनदास गांधी मुंबईला गेले. तेथून ते विलायतेची बोट धरणार होते. मातोश्री, बांधव व इतर हितचिंतक मित्रमंडळींची या बाबतीत योग्य ती सल्लामसलत झाली होती; सार्वत्रिक सहानुभूति मिळाली होती. परंतु, त्याचवेळी, पेल्यातल्या वादळाप्रमाणे जुनाट मनोवृत्तिच्या किटकानी उठाव घेतला.

मोढ-ज्ञातिमध्ये मोहनदासांच्या समुद्रोल्लंघनाबद्दल गडबड सुरू झाली. ज्ञातिच्या वाडीमध्ये त्याना बोलावण्यात आले. ते गेले. तेथे बरीच प्रतिष्ठीत मंडळी जमली होती. थोडे स्थीरस्थावर झाल्यावर ज्ञातिपैकीच एक प्रमुख शेटजी मोहनदासावर अधिकारी वाणीने गरजले:

"ज्ञातीचे मत आहे की, तू विलायतेला जायचा विचार केला आहेस तो बरोबर नाही. आपल्या धर्मामध्ये समुद्र ओलांडून जाण्याची मनाई आहे. शिवाय विलायतेत धर्म संभाळता येणार नाही. तेथे साहेब लोकाबरोबर खावे प्यावे लागते..."

यावर मोहनदासानी जबाब दिला:

"विलायतेला जाण्यात बिलकूल अधर्म नाही. मला तिकडे जाऊन विद्याभ्यास करावयाचा आहे. शिवाय ज्या गोष्टीबद्दल आपणास भीति वाटते त्या गोष्टीपासून दूर राहण्याची मी आईजवळ शपथ दिली आहे."

"आम्ही सांगतो, तिकडे धर्मपालन शक्य नाही. तुझ्या वडिलांचा

व माझा कसा संबंध होता ते तुला माहीत आहे! माझे तुला ऐकलेच पाहिजे." शेट अगदी निकरावर येऊन बोलले.

"ते सारे मला ठाऊक आहे. परंतु, याबाबतीत माझा निरुपाय आहे. विलायतेला जाण्याचा निश्चय मला फिरवेता येत नाही. विलायतेला जाण्यामध्ये मला सर्वांची संमति मिळालेली आहे." मोहनदासांनी उत्तर दिले. शेटजी आवाज चढवून म्हणाले:

"ज्ञातीचा हुकूम तू मानणार नाहीस?" तितक्याच नम्रपणाने मोहन-दास उत्तरले:

"माझा नाइलाज आहे. मला वाटते, या बाबतीत ज्ञातीने पडू नये!...." मोहनदासांच्या उत्तराने शेटजींचा क्रोध अनावर झाला. त्या भरात त्यांनी दोनचार शिव्या हासडण्यासही कमी केले नाही. अखेर त्यांनी शेवटचे दिव्यास्त्र सोडले:

"याला आजपासून बहिष्कृत समजण्यात येईल. जो त्याला मदत करील त्याला सव्वा सव्वा रुपाया दंड करण्यात येईल."

परंतु या प्रकाराचा मोहनदास गांधींच्या मनावर काहीएक परिणाम झाला नाही. ते वाडीतून एकदम बाहेर पडले.

+ + +

पुढे जाण्यापूर्वी, ज्ञातितील बुरसलेल्या जुनाट वृद्धांनी मोहनदास गांधींवर बहिष्कार पुकारण्यासारखा समुद्रोल्लंघनाचा प्रसंग कसा उद्भवला हे सांगितले पाहिजे. त्यामुळे चरित्र-परिचयही अनायसे होईल.

करमचंद उर्फ कबा गांधी आणि पुतळीबाई या मातापित्यांच्या पोटी भाद्रपद वद्य १२ संवत १९२५ (ता. २ आक्टोबर १८६९) दिवशी पोरबंदर=सुदामपुरी येथे मोहनदास गांधी यांचा जन्म झाला.

उत्तमचंद उर्फ ओता गांधी हे मो. गांधींचे आजे. पोरबंदर व जुनागड संस्थानच्या राज्यकारभारात ते प्रमुखपणे कामगिरीवर होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ५५८८
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
क्र. चरित्र ५४४
ता. २९/८/३०

संरक्षक !

त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव करमचंद हेही पोरबंदर संस्थानचे दिवाण झाले. पोरबंदर नंतर राजकोट व वाकानेर येथेही त्यांनी दिवाणगिरी केली.

वयाच्या सातव्या वर्षापर्यंत बालपणातच काळ गेल्यानंतर राजकोटच्या एका खाजगी शाळेत मोहनदासाना घातले. वाढत्या वयाबरोबर मगदुराप्रमाणे अभ्यासही त्यानी वाढता केला. येथे त्यांची हायस्कूलच्या शिक्षणापर्यंत प्रगति झाली. ५।६ वर्षांनंतर म्हणजे तेरा वयाच्या सुमारास त्यांच्या लग्नाबाबत गोष्टी सुरू झाल्या. तेवढ्यासाठी त्याना राजकोटहून पोरबंदरला यावे लागले. पोरस्वभावाप्रमाणे त्यावेळी लग्नाबद्दल त्याना फार आनंद झाला होता. लौकरच वडिलधाऱ्या मंडळींच्या संकल्पाप्रमाणे कस्तुरबाई व मोहनदास यांचा विवाह झाला. हा बालविवाह होता. लग्नानंतर वधू—वरानी एकमेकाशी कसे वागावयाचे हे त्याना कळत नव्हते. परंतु, लग्न करून देणारी मंडळी काही वधु—वरासारखी अज्ञान नव्हती. त्यापैकी ' वस्तादां 'नी त्या तशा वयातही त्या वधु—वराना उत्तम ' शिक्षण ' दिले होते. याबाबत खुद्द म. गांधी आपल्या आत्मवृत्त—कथनात म्हणतातः

" बोहल्यावर बसलो. सप्तपदी केली. शिरा खाल्ला, घास दिले आणि पतिपत्नी अशी आम्ही तेव्हापासूनच राहू लागलो. ती पहिली रात्र ! दोन निर्दोष बालकानी ज्ञान नसताना संसारात प्रवेश केला. मी पहिल्या रात्री कसे वागावे याची मला माझ्या वहिनीने शिकवण दिली. पत्नीला कोणी शिकविले ते मी विचारून घेतले नाही. आम्ही दोघेही एकमेकाना भीत होतो असे अंधुक आठवते. एकमेकांची लाज तर वाटतच होती. काय बोलावे, कसे बोलावे हे आम्हास काहीच कळत नव्हते. बाकीच्या शिकवणीचा तरी काय उपयोग ? आणि त्या गोष्टी काय शिकवाव्या लागतात ?...हळुहळू एकमेकाना आम्ही ओळखू लागलो, बोलू चालू लागलो. '

लग्नानंतर सुमारे एक वर्षाने पुन्हा मोहनदासाच्या शिक्षणास सुरवात

झाली. १, २, ३, ४, ५ व ६ यत्तापर्यंत चार सामान्य मुलाप्रमाणेच—पण शिष्य-वृत्या मिळवीत—त्यांचा शिक्षणक्रम सारखा चढत गेला आणि १८८७ इ. सनमध्ये ते मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले. त्यानंतरच्या अभ्यासाकरिता त्याना भावनगरच्या शामळदास कॉलेजमध्ये घालण्यात आले. कॉलेजचा अध्यापक वर्ग पहिल्या दर्जाचा असल्याबद्दल लौकिक होता. पण, मोहनदासाना तेथील शिकणे जड झाले. त्यात त्याना मुळीच गोडी वाटेना. सहा महिने होऊन गेले व ते परत घरी आले.

मध्यंतरी, करमचंदांच्या निधनामुळे गांधीकुटुंबावर अकस्मातच दुःखाचा प्रसंग ओढवला होता. मृत्युसमयी ते राजकोटदरबारचे पेन्शनर होते. मोहनदासांच्या लग्नापासूनच त्यांचा आजार चालू झाला होता. पुतळीबाईंच्या संरक्षणाशिवाय मायेवा असा मोहनदासाना वडीलबंधूंचा आधार होता. त्यामुळे दुःखावेग फार काळ सहन करावा लागला नाही.

ज्यावेळी, मोहनदास सहामाहीच्या सुट्टीत घरी आले, त्याच वेळी गांधीकुटुंबाचे एक हितचिंतक मित्र मावजी दवे ( उर्फ जोशी ) हेही तेथे त्यांच्या समाचाराकरिता आले होते. इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर बोलता बोलता ते म्हणाले:

"हे पहा, आता काळ बदलला आहे. कबा गांधींचो गादी संभाळण्याची तुम्हापैकी कोणाची इच्छा असली तर ती अधिक, वरिष्ठ शिक्षणाशिवाय मिळणार नाही. मोहनदास शिकतो आहे तर याचीच त्या कामी योजना करता येईल. पण, तेवढ्यासाठी शिक्षण बरेच करावे लागणार! तेव्हां त्याला तुम्ही पुढील शिक्षणाकरिता आता विलायतेलाच पाठवा. तीन वर्षात तो चांगला तयार होईल. खर्चही ४।५ हजाराहून अधिक होणार नाही." आणि नंतर त्यानी प्रत्यक्ष मोहनदासांचा सल्ला विचारला. "कायरे बुवा, तुला विलायतेला जाणे आवडेल की इथेच शिकावयाचा तुझा विचार आहे?"

मोहनदासानी संमात दिली; आणि ज्ञातिवृद्धांच्या यांच्यावरील

बहिष्काराला हे असे कारण झाले. परंतु त्यांनी त्याची फारशी फिकीर केली नाही. अगदी बेपर्वाईनेच त्यांनी आपला मार्ग ठरविला व मातोश्री पुतळीबाई, जैनसाधु बेचरस्वामी आणि इतर आप्त–बांधव यांच्या सहानुभूतिवर विलायतेच्या प्रवासाचा व्यवस्थेशीर विचार केला.

याप्रमाणे येणाऱ्या सर्व अडचणींना तोंड देऊन व प्रसंगाप्रमाणे धैर्य दाखवून मोहनदास ता. ४ सप्टेंबर १८८८ला मुंबई बंदरावरून निघणाऱ्या बोटीने विलायतेच्या मार्गाला लागले आणि योग्य काळी इंग्लंडला पोहोचले.

तेथे गेल्यावर, घरी मातोश्रींजवळ कबूल केल्याप्रमाणे शाकाहारी खाणावळ व इतरही दुसरी साध्या रहाणीला शोभणारी सोय लावून घेण्याकरिता त्यांना बराच त्रास सहन करावा लागला. पण इतका त्रास घेतल्यामुळे त्यांना पाहिजे तसे एक “ व्हिजिटेरियन रेस्टारंट ” शोधाअंति सापडले. ते फेरिंग्डम स्ट्रीटमध्ये होते. मोहनदास आपल्याला पाहिजे तशा कम्पनेने तेथे राहू लागले. परंतु, खरे पहाता इंग्लंडमध्ये अखेरपर्यंत त्यांना अनेक बिऱ्हाडे बदलावी लागली. तेथील रीतीरिवाज व शिष्टाचार पाळता पाळता ते १८९१ साली बॅरिस्टरीची परीक्षाही पास होऊ शकले; पण बाजारच्या परिक्षेत त्यांना पास होता आले नाही ते नाहीच.

---

सर्वप्रकारची.

# शालोपयोगी

आणि

# धार्मिक पुस्तके

मिळण्याचे ठिकाणः—नेर्लेकर बुकसेलर,

खादी भांडारसमोर, बुधवार, पुणे. नं. २.



" महान " पुरुष म० गांधी.

# - २ -

# ' चला फाशी द्यायला चिंचेच्या झाडावर गांधीला '

बॅरिस्टर होऊन मोहनदास गांधी परत स्वदेशी आले. त्यावेळी ' आपली मातुश्री ' वारल्याचे त्याना समजले. अगोदरच ही बातमी विलायतेला न पाठविण्याचा हेतू म्हणजे ' त्याच्या शिक्षणक्रमात अडथळा नको ' हा होता. त्याना स्नान घालण्यात आले. त्यावेळी होणारे दुःख अर्थातच कालावधिचे असल्याने फार काळ जाणवले नाही.

थोडे दिवस असे गेल्यावर मोहनदास आपल्या पुढील विचाराला लागले.

लहानपणापासूनच झालेल्या जैन–संस्कारामुळे त्यांच्याकडून बॅरिस्टरी-सारखा–सत्यासत्याचा आपल्या अशिलासारखा निर्णय लावून घेण्याचा–धंदा होणे शक्यच नव्हते. परंतु, या बाबतीत त्यानी करावयाचा तेवढा प्रयत्न करून पाहिला.

काय करावे हे त्याना कळेना–राजकोटहून मुंबईला, मुंबईहून पोर-बंदरला अशा त्यांच्या येरझारा पुष्कळ झाल्या. परंतु, मग...

दक्षिण आफ्रिकेतील एका मेमण पेढीवाल्याकडून–त्याच्या चालू असलेल्या कोर्टदरबारातल्या कामाकरिता मदतनीस बॅरिस्टर म्हणून उपयोग होण्यासारखा असल्यामुळे–मोहनदासाना कामगिरी मिळाली.

१८९३ च्या एप्रिल महिन्यात दक्षिण आफ्रिकेस आपल्या नशिबाची परीक्षा पहाण्यासाठी ते निघाले.

मुंबई सोडल्यानंतर लामू, लामूनंतर मोंबासा, मोंबासाहून झांजीबार, झांजीबारहून मोझांबिक, मोझांबिकवरून मग थेट डरबन; नाताळचे मुख्य बंदर. अशातऱ्हेने प्रवास संपवून डरबनमध्ये मोहनदास गांधी मुक्कामाला आले.

मुक्कामावर आल्यानंतर एके दिवशी ते एका मित्रासह डरबनचे कोर्ट पहाण्याकरिता गेले. त्यावेळी तेथल्या मॅजिस्ट्रेटने त्याना डोक्यावरची पगडी काढण्यास सुचविले. तो आशय समजताच पगडी न काढताच ते परत घरी गेले.

त्याना लौकरच तेथे 'कुली बॅरिस्टर' म्हणून प्रसिद्धी मिळाली.

पगडीने तर त्यांची चांगलीच जाहिरात केली. पगडी–प्रकरण त्यानी वर्तमानपत्राकडे पाठविले; ते 'आगांतुक पाहुणा' म्हणून प्रसिद्ध झाले! पण यामुळे त्यांची आफ्रिकाभर प्रसिद्धी झाली.

ज्या कामाकरिता मो० गांधी इकडे आले होते, त्या कोर्टकामापैकीच काही कागदपत्र पहाण्याकरिता प्रिटोरियाला त्याना जावयाचे होते म्हणून ते डरबनहून रेल्वेने निघाले. नाताळची राजधानी मॅरित्सबर्ग येथे आले. यावेळी रात्रीचे नऊ वाजले होते. तिकडील पद्धतीप्रमाणे 'बिछान्या'ची चौकशी झाली. हे पहिल्या वर्गाच्या डब्यात बसले होते. येथे बहुधा गोऱ्या लोकांचाच हक्क मानसन्मानाचा होता. हे पडले हिंदी–कुली–गौरेतर! काटकसर म्हणून ह्यानी 'बिछाना' नको म्हणून सांगितले. त्यांचा त्यांच्याबरोबर होता. थोड्याच वेळात रेल्वेचा अधिकारी आला आणि तो मो० गांधींना म्हणाला:

"तुम्ही शेवटच्या डब्यातून जायचे आहे." यावर मोहनदास गांधी उत्तरले:

"माझ्याजवळ पहिल्या वर्गाचे तिकीट आहे." त्यावर तो अधिकारी म्हणाला:

"मी सांगतो तुम्ही शेवटच्या डब्यातून जावे." परंतु मो० गांधींनी हे ऐकले नाही व ते आपला हक्क बजावण्यास्तव सिद्ध झाले. अधिकाऱ्याने शिपायाकडून त्याना ओढून खाली उतरवले. त्यांचे सामान अस्ताव्यस्त टाकण्यात आले; आणि गाडी निघून गेली.

संरक्षक !

याप्रमाणे अनेक प्रकारच्या हालअपेष्टा सहन करीत ते एकदाचे प्रिटो-रियाला येऊन पोहोचले. पण; कुठेही गेले तरी पळवाले पाने तीनच !

तेथेही त्यांच्यावर आक्रमणाचे प्रसंग यावयाचे ते आलेच !

जवळ जवळ एक वर्षानंतर कोर्टदरबारचे काम—वादीप्रतिवादींच्या समेटाने संपले. हे सारे बुद्धिचे काम मो॰ गांधींनी केले. हजारो रुपये सरकारच्या तिजोरीकडे जाणार होते; ते वादी—प्रतिवादींच्या घरातच राहिले. अशा तऱ्हेने प्रिटोरियातील काम संपताच ते परत डरबनला आले. आता परत ते स्वदेशाकडे फिरण्याच्या बेतात होते. इतक्यात त्याना समजले की, "हिंदीलोकाना नाताळच्या कायदेकौन्सिलामध्ये सभासदाची निवडणूक करण्याचा हक्क होता तो काढून घ्यावयाच्या संबंधात कायद्याच्या बाबत कौन्सिलातून चर्चा चालू आहे." या गोष्टीकडे त्यांचे चांगलेच लक्ष वेधले. त्यानी त्यांचे अशील शेट दादा अबदुल्ला याना ही गोष्ट समजावून सांगि-तली. यावेळी तेथे असलेले दुसरे पाहुणेही त्यांच्या सांगण्याकडे लक्ष देऊन बसलेच होते. त्यांच्या, अबदुल्ला शेटच्या आणि स्वतःच्या विचाराप्रमाणे मो॰ गांधींनी आणखी थोडे दिवसाचा मुक्काम वाढविला.

पहिल्यांदा एक साधी—खाजगी—सभा भरविण्यात आली आणि त्यानंतर प्रत्यक्षच कार्यास सुरवात झाली. 'मताधिकारा'च्या बाबत निघालेले बिल पास झाले. पण, त्यावेळेस करण्यात आलेल्या अनेकविध प्रयत्नामुळे मो॰ गांधींची प्रसिद्धी मात्र फारच झाली. ता. २२ मे १८९४ रोजी सार्व-जनिक काम करणारी 'नाताळ—इंडियन—कॉंग्रेस' ही स्थापन करण्यात आली. येथूनच सार्वजनिक कामाच्या आखाड्यात त्यानी उडी टाकली, असे म्हण-ण्यास हरकत नाही. आफ्रिकेतला त्यांच्या बाबतीतला एक ठळकतर प्रसंग सांगून हे वास्तव्य सोडून देऊ.

\+ \+ \+

आफ्रिकेला येण्याची त्यांची ती दुसरी खेप होती.

दादा अबदुल्लाच्या मालकीची 'कूरलंड' व ते जिथे एजंट होते ती 'नादरी' अशा दोन आगबोटी डरबन बंदरात धक्क्यापासून बऱ्याच दूरवर नांगर टाकून समुद्रात उभ्या होत्या. दोन्ही बोटींवरील मुलावाळा-सकट स्त्री-पुरुष उतारू आठशेपर्यंत असतील.

बरोबर तेवीस दिवसानी बोटी धक्क्याला लावण्याचा व उतारूना उतरण्याचा हुकूम मिळाला.

कस्तुरबाई, दोन स्वत:ची व एक मेहुण्याचा अशी तीन मुले याना गाडीतून पुढे पाठवून मो. गांधी अबदुल्लाशेटचे वकील व त्याचे मित्र मि. लॉटन् यांचेबरोबर राजरस्त्याने पायीच निघाले. यावेळी संध्याकाळचे चार साडे चार वाजले असतील. बोटीतून उतरतानाच त्याना ओळखून थाब-लेली मुले आस्ते आस्ते त्यांच्या सभोवार चालू लागली आणि थोड्याच वेळात मोठ्याने ओरडून

"गांधी, गांधी, ठोका, वेढा.... "

असा त्यानी एकच गिल्ला केला. मुलात मग मोटमोठी गोरी बाळे (!) ही जमा झाली व सर्वांकडून त्यांच्यावर लाथा बुक्क्यांचा, कुजक्या अंड्यांचा वर्षाव होऊ लागला. मि० लॉटनने गाडी करण्याचा प्रयत्न केला; पण गाडी-वाला 'स्वारी' घेण्यास तयार होईना. कोणा तरी एका बळवान इसमाने मि० लॉटनना मो. गांधीपासून खेचून दूर नेले. तोवर फारच मोठा जनसमु-दाय जमला. त्यानी अगदी मुक्तपणे शिव्यांचा, धोंड्यांचा, हाताला जे काही मिळेल त्याचा त्यांच्यावर सरास मारा सुरू केला. एकाने त्यांची पगडी उडवून दिली. एका मोठ्या माणसाने थप्पड मारून एक रणसणीत ठोसा लगावला. त्याना तिरीमिरी आली. ते आता पडणार तो एका गौरकाय स्त्रीने डरबनच्या पोलीस-सुपरिंटेंडेंटच्या स्त्रीने त्याना हात दिला व पोलीस-चौकी-पर्यंत सोबत केली. पुढे, पोलिसच्या मदतीने त्याना मुक्कामावर जावे लागले. तेथे गेल्यावर त्यांची सेवा-शुश्रुषा बरीच करण्यात आली. पण, अजूनही

त्यांचे स्वास्थ्य त्यांच्या कबजात आले नव्हते. घराबाहेर लोकांचा फारच मोठा घोळका जमलेला होता व तो घरमालकाकडे त्यांचीच मागणी करीत होता. ही बातमी चौकीवर समजली व पो. सु. मि. अलेक्झांडर आपल्या अनुयायासह येथे हजर झाले. लोकाना शांत होण्यास सांगताना ते एकदा विनोद करीत होते तर दुसऱ्या अर्थाने त्याना धमकी देत होते. इतकेच नव्हे तर मधून मधून रंगात येऊन

'चला फाशी द्यायला
चिंचेच्या झाडावर गांधीला'

अशा तऱ्हेचे गाणे म्हणत होते. परंतु तत्पूर्वीच त्यानी गुप्तपणाने मो० गांधीना पोलिसचा वेष देऊन तेथून पोलिस–ठाण्यावर स्वसंरक्षणाखाली पाठविले होते. लोक तेथे आरडा ओरड करीत होते. त्याना मग पो. सु. ने खरी हकीकत सांगितली आणि तेथून जाण्यास सांगितले. लोकांची फार निराशा झाली. 'हिंदुस्थानात नाताळमधील गोऱ्या लोकांच्या खोट्यानाट्या बातम्या पसरविण्याबद्दल त्यांचा मो० गांधीवर राग झालेला होता' आणि या रागाच्या भरात ते त्याना वाटेल ते शासन द्यावयास तयार झाले होते. परंतु, गोरे लोक असे पिसाळलेले होते म्हणून मो० गांधीनी आपला मार्ग मात्र बिलकूल सोडला नाही. उलट 'नाताळ–कॉंग्रेस' स्थापून आफ्रिकेतल्या लोकावर होणारा अन्याय व त्यांची दुःखे पार्लमेंटपर्यंत पोहोचविली, जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत दुमदुमविली; आणि त्याचा योग्य तो परिणामही घडून आणला.

येथील सार्वजनिक कामगिरीबद्दल लोकानी मो० गांधीना भेटी, नजराणे, मानपत्रे अनेक दिले. 'समाज सेवकाला खाजगी नजराणे घेताच येत नाहीत' अशा, थोर विभूतिच्या विचाराने त्यानी त्या सर्व दागदागिन्यांचा एक सार्वजनिक ट्रस्ट बनविला आणि 'त्याचा सार्वजनिक कार्यासाठी उपयोग व्हावा' असे ठरवून ते सहकुटुंब सहपरिवार स्वदेशी परत आले.

येवढे सारे झाले म्हणून मो॰ गांधींना आफ्रिका अजिबात सुटली होती असे मुळीच नाही. यानंतर त्यांनी प्रसिद्ध अशा बोअरयुद्ध व झुलूबंड या प्रसंगी सरकारच्या बाजूने काम करून उत्तम लौकिक मिळविला. फिनिक्स आश्रमाची स्थापना करून तेथे त्यांनी छापखाना व 'इंडियन ओपिनियन' हे वर्तमानपत्र चालविले.

---

खेड्यातील दरिद्र्यातील दरिद्रि खेडूताला खात्रीने
दोन घास देणारी

# खादी

## आपण वापरा

आणि

## दुसऱ्यास वापरावयास सांगा

कॉंग्रेस खादी भांडार,

बुधवार चौक, पुणे सिटी.

संरक्षक !

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १५

— ३ —

## " बाहेरील कटवाल्यापैकी एक बडा कटवाला म्हणजे गांधी...."

ब्रह्मचर्य, उपवास, संयम, आहार, सत्याग्रह, अहिंसा, आरोग्य, बहिष्कार, धर्मविचार इत्यादि प्रयोगाने आपले सामर्थ्य वाढवीत असतानाच पाटणा-बिहारच्या निळीबाबत चंपारण्यात मो० गांधींना आपल्या सहकाऱ्यासह सत्याग्रहाची चळवळ करावी लागली. गुजराथमधील खेडा-जिल्ह्यातल्या करबंदीच्या-दारूबंदीच्या आणि अहमदाबाद येथे मालक व मजूर यांच्यामधील संपाच्या चळवळीमुळे मो० गांधी स्वदेशीय राजकारणात पूर्णपणे सामील झाले. १९१४-१८ पर्यंत झालेल्या महायुद्धातही त्यांनी भाग घेतलाच होता.

महायुद्धावरील आपापली कामगिरी आटोपून हिंदी सैन्य नुकतेच परत आले होते. युद्धात पतन पावलेल्या हिंदी नरवीरांची स्मारके देशोदेशी उभारली जात होती; तन्निमित्त सरकारतर्फेने मोठमोठे समारंभहि होत होते.

आणि बरोबर याचवेळी, म्हणजे १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यात: महायुद्धात हिंदुस्थानने तनु-मन-धनेंकरून केलेल्या साम्राज्यसरकारच्या सेवेबद्दलचा मोबदला म्हणून,-स्वराज्य नव्हे, तर......

दोन रौलेट बिले हिंदुस्थानला ' देणगी ' म्हणून देण्याचे जाहिर केले.

१—' राजकारणात गुन्हेगार ठरलेल्यांची चौकशी तावडतोब व्हावी, अपील करण्याचा हक्क नसावा, संशयास्पद माणसाकडून जामीन मागणे, स्थानबद्ध करणे, राजकारणात काम करण्यास बंदी करणे इ०

२—' राजद्रोहात्मक वाङ्मय छापण्याचा किंवा त्याचा प्रचार करण्याचा; तशा उद्देशाने जवळ बाळगण्यासुद्धा गुन्हा समजला जाऊन त्या करिता तुरुंगाची शिक्षा देणे वगैरे. '

त्या दोन रौलेट–ॲक्टांचे स्वरूप हे असे होते.

काँग्रेसचे तेविसावे ( वार्षिक ) अधिवेशन २६ डिसेंबर १९१८ ला दिल्ली येथे भरले होते आणि परिस्थितीप्रमाणे बोलावलेली एक काँग्रेसची बैठक अमृतसर येथे भरावयाची होती.

रौलेट–बिलाला कायद्याचे स्वरूप देण्यात येऊ नये म्हणून मो० गांधींनी लोकमत जागे करण्याकरिता देशभर दौरा काढला, लोकमत अंदाजले व स्वतः उपवास करून–आत्मशुद्धि करून–चळवळीला प्रारंभ केला. '३० मार्च रोजी हरताळ पाळण्यात यावा, प्रार्थना करण्यात याव्या व सर्वत्र सभा भरवून रौलेट–बिलाचा जाहीर निषेध करण्यात यावा' असे ठरविण्यात आले. पण, पुढे ही तारीख बदलून '६ एप्रिल १९१९' मुकरर करण्यात आली.

दिल्ली येथे बदललेली तारीख न समजल्यामुळे ता. ३० लाच हरताळ पाडण्यात आला. स्वामी श्रद्धानंद ह्यांनी यावेळी पुढाकार घेतला होता. या बाबतीत म० गांधी आपल्या आत्म–कथनात म्हणतातः

"दिल्लीमध्ये त्या दिवशी पडला तसा हरताळ पूर्वी कधीच पडला नव्हता. हिंदु व मुसलमान दोघेहि एकदिल झाल्यासारखे दिसले. श्रद्धानंदजींना जुम्मामशिदीमध्ये घेऊन जाण्यात आले. व तेथे त्यास भाषण करू देण्यात आले. हे सर्व सत्ताधाऱ्यांना सहन होऊ शकले नाही. मिरवणूक रेल्वेस्टेशनकडे जात असता पोलिसांनी अडविली. पोलिसांनी गोळीबार केला. काही लोक जखमी झाले, काहींचे खूनही झाले. दिल्लीमध्ये दडपशाही सुरू झाली. श्रद्धानंदजींनी मला दिल्लीला बोलाविले......जी स्थिति दिल्लीची तीच लाहोर, अमृतसरची....

...मुंबईला सहा तारखेस सकाळच्या प्रहरी हजारो लोक चौपाटीवर स्नान करावयाला गेले व तेथून मिरवणूक निघाली. त्यात स्त्रिया व मुलेही सामील झाली होती. मिरवणुकीमध्ये मुसलमानांनीही मोठ्या संख्येनिशी भाग

घेतला होता. या मिरवणुकीतून आम्हाला मुसलमानबंधु एका मशिदीत घेऊन गेले. तेथे श्री० सरोजिनीदेवीकडून व माझ्याकडून भाषणे करवून घेतली... ”

दिल्ली–स्टेशनवर दंगा झाला. गोळीबारही झाला. पाच इसम मेले, २०--२५ जखमी झाले. सर्व देशभर अशा रितीने सभा, मिरवणुकी झाल्या आणि ठिकठिकाणी दंगेधोपे होऊन गोळीबार करावे लागले. त्यावेळचा चीरस्मरणीय प्रसंग म्हणजे ‘ जालियनवाला–बाग ’ चा ! या बागेत जाहीर सभा भरविण्याचे ठरले होते व त्याप्रमाणे स्त्री पुरुष व मुले मिळून अंदाजे वीस एक हजारावर लोकसमुदाय जमला होता. ही बातमी समजताच जनरल डायर हिंदी–ब्रिटिश असे १५० सशस्त्र सैनिक ( शिपाई ) घेऊन तेथे गेला व सभेतील लोकसमुदायावर त्याने एकदम गोळीबार सुरू केला. सरकारच्या या बाबतीतल्या रिपोर्टावरून यावेळी ४०० लोक मृत्युमुखी पडले व हजार-दोन हजार जखमी झाले असे उघड झाले. यावेळी एकंदर १६०० गोळ्या झाडण्यात आल्या होत्या.

रौलेट ॲक्टच्या निषेधार्थ म्हणून मो. गांधींना ज्या या चळवळीला उठाव दिला ; त्याचा देशामध्ये भयंकर असा खळबळ उडविणारा परिणाम घडून आला. सरकारच्या बाजूने हे जे हत्याकांड झाले; त्याचे मूळ मोठे विचार करण्यासारखे आहे. या संबंधात ‘ पंजाब–प्रकरणा ’च्या लोकनियुक्त कमिटीने तयार केलेल्या रिपोर्टामध्ये पुढील प्रसंग दिला आहे:

“ हिंदु–मुसलमानामध्ये उत्पन्न झालेली एकजुट व बंधु–भाव ह्याना सरकारविरुद्ध गुप्त कट असे स्वरूप देण्यात येईल ” असे सर मायकेल ओडवायर ह्यांनी याच्या पूर्वीच म्हणजे ता. ७ एप्रिल रोजी बोलून दाखविले होते.

ना. रायजादा भरतराम–जालंदरचे एक बॅरिस्टर–ह्यांची व सर मायकेल ह्यांची त्या दिवशी मुलाखत झाली. तेव्हां घडलेली हकिकत सांगताना भरतराम म्हणतातः

" कायदे-कौन्सिलची बैठक संपल्यानंतर लेफ्टनंट गव्हर्नरसाहेबांची व माझी त्यांच्याशा खास बैठकीच्या दालनात गाठ पडली. तेव्हां त्यांनी मला विचारलेः

" जालंदर येथे कसा काय हरताळ झाला ? " तेव्हां मी सांगितले:

" हरताळ अगदी फार मोठ्या प्रमाणावर होऊन कोणत्याही प्रकारची धामधूम किंवा गडबड झाली नाही. " तेव्हां, ' गडबड न होण्याचे काय कारण ? ' असे त्यांनी मला विचारले. तेव्हां मी उत्तर दिले कीः

" महात्मा गांधींनी आत्मबलाचे सात्विक तत्व लोकांस शिकविले असल्यामुळे काही धामधूम झाली नाही. " तेव्हां सर मायकेल ह्यांनी मूट वळून व ती माझ्यापुढे उगारून म्हटलेः

" रायजादासाहेब, ध्यानात ठेवा की, गांधींच्या आत्मबलापेक्षा आमच्या जवळ जास्त-जबरदस्त-असे बल आहे. "

याशिवाय, त्यावेळच्या सरकारी कलमबहादुरांचे लिहीणे अगदीं टळक होते कीः

" कायद्याने प्रस्थापित झालेल्या हिंदुस्थान-सरकारविरुद्ध हिंदु-मुसलमान ह्यांचे दरम्यान भ्रातृभाव मुद्दाम उत्पन्न केला. ता. १० एप्रिल रोजी बाहेरील कटवाल्यांपैकी एक बडा कटवाला म्हणजे गांधी ह्याला पंजाब प्रांतात येण्याची पंजाबसरकारने बंदी केली व अमृतसर येथील दोन गुप्त कटवाले किचलू व सत्यपाल नावाचे इसम हद्दपार करण्यात आले. "

या सर्वांचा, उघड उघड-सरकारी कागाविलोरीचा-अर्थ असा कीः

हिंदुस्थानात हिंदु-मुसलमानांची एक जूट होणे; त्याच्यात बंधु-भाव निर्माण होणे म्हणजे तो ' कायद्याने प्रस्थापित झालेल्या सरकारविरुद्ध ' गुप्त कट होतो आणि त्याचे प्रायःश्चित्त देण्यास सरकारच्या संगिनीच फक्त उपयुक्त होतात.

# — ४ —

# " मनगट मोडले तरी हरकत नाही परंतु मूठ उघडी होता कामा नये "

पंजाब-प्रकरणानंतर किंबहुना त्यावेळेपासूनच महात्मा गांधी राष्ट्रीय कार्यकर्ते प्रमुख बनले आणि त्यावेळेपासून १९२२ पर्यंत त्यांनी शक्य तेवढे प्रयत्न करून देशाला उन्नतीपथाकडे नेण्याचा प्रयत्न केला. यावेळी देशाचे वातावरण भरपूर उबदार झाले होते. म० गांधींनी गुजराथमधील बारडोली-तालुक्यात कर-बंदीची म्हणजे एकाप्रकारे कायदेभंगाची चळवळ करण्याचे जाहीर केले व त्याप्रमाणे त्यांनी ता. १ फेब्रुवारी १९२२ रोजी पत्र पाठवून व्हाइसरॉयना कळविले. पण नेहमीप्रमाणे सरकार ' आपल्याच वृत्तीत ' ताठ राहिले. दुर्दैवाने याचवेळी संयुक्त प्रांतातील गोरखपूर जवळील चौरीचुरा येथे दंगा झाला आणि त्यात १ पो. सब-इन्स्पेक्टर व २० शिपाई आगीला बळी पडले. तत्पूर्वी, युवराज-प्रिन्स ऑफ वेल्स-यांच्या आगमन प्रसंगी, ठिकठिकाणी घडलेल्या बहिष्काराच्या वेळी मद्रास व मुंबई येथेही दंगे झाले होते. या प्रकारामुळे म. गांधींच्या सल्ल्यावरून ' वर्किंग कमिटी 'ने कायदेभंगाची चळवळ एकदम तहकूब केली. ' चळवळ होण्यापूर्वी ही स्थिति तर प्रत्यक्ष कायदेभंगाची चळवळ करताना कोणती स्थिति होईल ?' या भावी विचारामुळेच अर्थात् आखलेला कार्यक्रम मागे घ्यावा लागला. तरीसुद्धा, दारूवर पूर्णबंदी पडावी म्हणून दुकानादुकानावर पिकेटिंग करण्याचे ठरविण्यात आले. कायदेभंगावर सर्वांचा विश्वास होता. परदेशी कापडांच्या दुकानावरहि पिकेटिंग करण्याचे ठरले.

कायदेभंगाच्या चळवळीच्या नुकत्या कल्पनेनेच सरकार म० गांधीवर गरमागरम झाले होते. तशात, युवराजाच्या आगमनावर कडकडीत बहिष्कार

पाडण्यात आलेला होता; आणि अशा वेळीच दोन तीन ठिकाणी आत्मघातक दंगेही झाले. मग या सर्वांचे प्राय:श्चित म० गांधींना भोगावयास लावणे सरकारचे कर्तव्यच होते ! त्याप्रमाणे, त्याना अटक करण्यात आली. 'त्यांच्या-वर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात येऊन' झटपट खटला सेशन कोर्टाकडे पोहोचविण्यात आला. 'यंग इंडिया'तील १ राजनिष्ठेचा लाच, २ कूट प्रश्न व त्याचा उलगडा आणि ३ आयाळ झटकणे. हे तीन लेख राजद्रोही ठरवून त्याना सहा वर्षांची शिक्षा दिली. पूर्वी लो० टिळकानाही सरकारने अशीच शिक्षा दिली होती. 'टिळकांच्या एवढे भाग्य' लाभल्याबद्दल म० गांधीजीना त्यावेळी समाधान वाटले.

सहा वर्षांपैकी चार वर्षे शिल्लक असताच—आजारामुळे व भावी परि-णामाकडे लक्ष द्यावे लागल्यामुळे—५ फेब्रुवारी १९२४ मध्ये त्यांची विनशर्त सुटका करण्यात आली.

यानंतर, देशभर आघात, प्रत्याघात होता होताच २४, २५, २६, २७, २८, २९ आणि १९३० अशी वर्षांवर वर्षे उलटून गेली. व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांची कारकीर्द सुरू झाली. सरकार व जनता यांच्यामध्ये कर्तव्याकर्तव्यापर्यंत विचार करण्याची मर्यादा गेली. व्हाइसरॉयच्या भाषणाला एक प्रकारे-प्रत्युत्तर म्हणून म० गांधींनी पुढील लिखाण प्रसिद्ध केले :

"सर्व वातावरण निवळून टाकण्याबद्दल व्हाइसरॉयसाहेबांचे आभार मानणे जरूर आहे. आता, आपली व त्यांची भूमिका आपण स्पष्टपणे ओळखू या !

प्रत्येक लक्षाधीश, ७ पैसे रोज मिळविणाऱ्या मजुराच्या स्थितीला जाई-पर्यंत, वसाहतीच्या स्वराज्याची देणगी थोपवून धरण्यास व्हाइसरॉयची काहीच हरकत नसणार.

कॉंग्रेसच्या हाती सत्ता असती तर आजच्या आज ज्या स्थितीत जीव-नाची सोय होईल, फार काय लक्षाधीशाच्या दर्जाचे जीवन मिळेल तितक्याही

५५८९

संरक्षक !

उच्च स्थितीला प्रत्येक अर्धपोटी शेतकऱ्याचे नेऊ शकेल ! त्यावेळी शेतकऱ्याला आपली स्थिति ओळखण्याचे ज्ञान येईल आणि त्यावेळी त्याला कळेल की, या असहाय स्थितीला आपणास जिने आणले ती काही किस्मत् ( दैव-शक्ति ) नसून ती प्रचलित सत्ता आहे. त्यावेळी कोणाच्याही सहाय्याची अपेक्षा न करता, तो शेतकरीच अत्यंत अधीर होऊन सनदशीर आणि बेकायदेशीर आणि अत्याचारी व अनात्याचारी साधनांचा भेदाभेद क्षणार्धात नाहीसा करून टाकील ! किसानांना ( शेतकऱ्यांना ) योग्य दिशा दाखविता येईल ही काँग्रेसची अपेक्षा आहे.

---

१ मद्यपानाची पूर्ण बंदी.

२ हुंडणावळीचा भाव १६ पेन्स.

३ जमीनमहसूल कमीत कमी शेकडा ५० ने कमी करणे आणि महसुलाची बाब कायदेमंडळाच्या अधिकाराखाली ठेवणे.

४ मिठाचा कर रद्द करणे.

५ लष्करी खर्च सुरवातीला निदान शे. ५० ने उतरविणे.

६ वरिष्ठ जागांचे पगार निमपटीने किंवा त्यापेक्षा थोडेसे कमी, इतके कमी करून जमीनमहसुलाची भरपाई करणे.

७ परदेशी कापडावर संरक्षक जकात बसविणे.

८ बंदरावरील व्यापार ताब्यात ठेवण्याविषयींचे बिल तयार करणे.

९ खुनाबद्दल किंवा खुनाच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा झालेल्या कैद्याशिवाय इतर सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता किंवा मामुली न्यायमंदीरापुढे चौकशी करणे, सर्व राजकीय खटले काढून घेणे, १२४ अ कलमाचा १८१८ च्या ३ रेग्युलेशनचा अंमल रद्द करणे व हद्दपार झालेल्या सर्व हिंदी इसमांना परत येण्यास परवानगी देणे.

१० गुप्त पोलीसांचे खाते रद्द करणे किंवा लोकमताच्या नियंत्रणाखाली आणणे.

११ स्वसंरणासाठी सार्वजनिक हिताचे बंधन संभाळून दारुगोळ्याची हत्यारे बाळगण्यास परवानगी देणे.

अत्यंत आवश्यक अशा गरजांची ही पूर्ण यादी आहे असे मुळीच नाही; परंतु या अत्यंत साध्या व अत्यावश्यक अशा आजच्या गरजा व्हाइसरॉयनी पुरवाव्या. मग त्याना सविनय कायदेभंगाची भाषा ऐकावीसुद्धा लागणार नाही. मग ज्या ठिकाणी विचार व्यक्त करण्याचे व मागणी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे अशा कोणत्याही परिषदेत कॉंग्रेस मोठ्या आनंदाने भाग घेईल. याचाच अर्थ असा आहे की, एवढ्या साध्या व आवश्यक गरजाही नाकारल्या गेल्या तर त्याचा अर्थ सविनय कायदेभंगाची सुरवात हाच होणार !

इतर राष्ट्राना स्वातंत्र्य मिळविण्याची दुसरी व निराळी साधने असतील. परंतु, हिंदुस्थानला मात्र अनात्याचारी असहकारितेखेरीज गत्यंतर नाही. या स्वराज्यमंत्राचे आपण प्रणेते व्हा आणि आपले सर्वस्व या हिंदी स्वातंत्र्ययुद्धात अर्पण करण्याचे धैर्य व सामर्थ्य परमेश्वर आपणास देवो. हे युद्ध आता अगदी जवळ येऊन ठेपले आहे. ”

यशिवाय व्हाइसरॉयना म. गांधीजी शेवटचे असे; चालू परिस्थितीचा ज्यात सविस्तर खुलासा केलेला होता असे पत्र पाठवून आणि देशापुढे न टाळता येणाऱ्या कार्यांचा भरपूर पुरस्कार करून मिठावरील कायदेभंगाच्या मोहिमेस आश्रमातील ७९ अनुयायासह सुरवात केली. सरकारने आपला ताठरपणा बिलकूल कमी केला नाही.

अमदाबादला ऑ. इं. कॉं. कमिटीच्या वर्किंग कमिटीने मान्य केलेल्या ठरावाप्रमाणे ‘ सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा व तीवर नियंत्रण ठेवण्याचा म. गांधींना पूर्ण अधिकार देण्यात आला ’ आणि

‘ उद्या, बापुजी ( म० गांधी ) कदाचित पकडले जातील ’ या शंकेने अगोदरच्या रात्री आश्रमातील मंडळींच्या डोळ्याला डोळा असा

मुळीच लागला नाही. सारी रात्र जागृतावस्थेत गेली. रात्रभर आश्रमाच्या चौफेर सर्वांचे दृष्टीक्षेप होत होते. गावातून लोकांच्या झुंडीच्या झुंडी साबरमती ( अमदाबाद ) च्या आश्रमाकडे चौकशीकरिता येऊन जात होत्या. अशा प्रकारे हळुहळू रात्र संपून पहाट झाली.

आकाश लाल होत चालले. पक्षाने किलबिलाट सुरू केला. आश्रमातील घंटा वाजली. भारतवर्षाचे, हिंदुस्थानचे लोकनियुक्त सेनानी महात्मा गांधीजी जागे झाले. आश्रमातील सर्व स्त्री-पुरुष मंडळीबरोबर 'प्रातः स्मरामि हृदि संस्फुरदात्मतत्त्वम्' इ. प्रार्थना केली. आश्रमात राहणाऱ्या स्त्रिया आणि आजारी माणसाना आशिर्वाद दिले.

सर्व तयारी होताच ७९ अनुयायांच्या समवेत म. गांधी, बरोबर साडे सहा वाजता आश्रमातून—ठरविलेल्या दांडी गावाकडे जाण्याकरिता-बाहेर पडले. त्यानंतर मुक्काम करीत करीत, बरोबर चोवीस दिवसानी म्हणजे ५ एप्रिल १९३० रोजी सकाळी ते दांडीला पोहोचले.

ता. ६ एप्रिलपासून राष्ट्रीय आठवडा सुरु होत असल्यामुळे व हा दिवस जालियनवाला बाग—दिन असल्यामुळे मिठावरील आक्रमणास तोच नक्की ठरविण्यात आला.

'सकाळची प्रार्थना संपताच आपल्या बरोबरच्या स्वयंसेवकासह म. गांधी समुद्र—किनाऱ्यावर गेले' आणि त्यानी विनापरवाना मीठ उचलून मिठावरील कायदे—भंगाच्या कार्यास प्रारंभ केला; त्यांच्याबरोबर अनुयायांनीही त्यांचे अनुकरण केले, आणि मग या चळवळीस लौकरच सार्वत्रिक स्वरूप देण्यात आले.

म. गांधीजी ठिकठिकाणी जनता—जागृति करीत करीत व कायदेभंगाचाही त्याबरोबरच प्रयोग करीत ता. ४ मे १९३० ला गुजरातमधील कराडी गावी छावणी देऊन बसलेले होते आणि त्या दिवशी ते जरूर पकडले जातील अशी अफवा पसरली होती.

अर्धी रात्र उलटून गेली होती, सर्व जग यावेळी निद्राधीन झाले होते–
आणि याचवेळेनंतर–रात्री १ वाजून ४५ मिनिटांनी म. गांधींना गिरफदार करून सरकारने त्यांना उजळ (!) माथ्याने पुण्याच्या येरवडा येथील 'सेंट्रल प्रिझन' कडे कैद करून नेलं.

"आपणावर हा प्रसंग येणार" हे म. गांधी अगोदरपासूनच जाणून होते व म्हणून 'आपला संदेश' त्यांनी तयार करूनच ठेवलेला होता.

"हा शुभारंभ शेवटास नेला तर संपूर्ण स्वातंत्र्यही खात्रीने मिळेल आणि त्यामुळे हिंदुस्थानने सर्व जगापुढे आपल्या सामर्थ्याचा आदर्श ठेवला असे होईल. स्वार्थत्यागावाचून मिळविलेले स्वराज्य कधीही टिकाव धरीत नाही. म्हणून लोकांना अमर्याद स्वार्थत्याग करावा लागेल. खऱ्या स्वार्थत्यागात फक्त एकांगी दुःखे भोगावी लागतात. आणि ती म्हणजे दुसऱ्याला न मारता स्वतःच मरण पतकरावे लागते. हिंदुस्थानला हे ध्येय गाठता येवो. या क्षणी हिंदुस्तानचा स्वाभिमान व सर्वस्व एका मूठभर मिठात साठवले आहे. मनगट मोडले तरी हरकत नाही, परंतु मूठ उघडी होता कामा नये.

परमेश्वर हाच या युद्धाचा नेता आहे, मी नाही. जर आपल्यामध्ये आत्मविश्वास असेल तर परमेश्वर आपणास नक्की मार्ग दाखविल. आपला मार्ग ठरलेला आहे. सर्व खेडी मीठ उचलण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी पुढे आली पाहिजेत; प्रत्येक आबालवृद्धाने तकली चालवावी. व दररोज पेळूंचे गठ्ठेच्या गठ्ठे विणले गेले पाहिजेत. परदेशी कापडाच्या होळ्या पेटल्या पाहिजेत. हिंदूंनी कोणालाही अस्पृश्य मानू नये..." इ.

म. गांधींना अटक झाल्यानंतर काय झाले नि काय झाले नाही, हे सांगण्याचे कारणच नाही. जे व्हावयाचे ते झालेच; पण जे कधीकाळी घडले नसते तेही अनर्थ यावेळी झाले. सर्व देशभर एकच अनर्थपरंपरा थैमान घालू लागली.

सरकार अगदीच गांगारून गेले. 'काय करावे अन् काय करू नये' या बाबींचा त्यांना मोठा पेच पडला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल रुप
सं.
ता.

## - ५ -

## " माझ्या हातून हे मोठे कार्य घडून यावे या करिताच परमेश्वराने मला बुद्धि व भाषा दिली आहे. "

'म० गांधींची अटक' हा एकच त्यावेळी जगाचा विषय झाला होता. निरनिराळ्या धर्म-पंथाच्या अनेक अमेरिकन पाद्री-बिशपानी इग्लंडचे एक प्रधान मि. रॅम्से मॅकडोनाल्ड याना तार पाठविली व हिंदीजनतेबरोबर सामोपचाराने तडजोड करावी असे कळविले. त्याचप्रमाणे, न्यूयार्क (अमेरिका) येथील प्रसिद्ध गृहस्थ मि. जॉन हाइन्स होम्स ह्यानीही अनेक सह्या मिळवून प्रधानाना एक निरोप पाठवला; ही शोककारक तेढ टाळावी. कारण ही तेढ म्हणजे सर्व मानवजातीवरील मोठे संकटच ठरेल, हा त्या निरोपाचा मुख्य आशय.

परदेशी पत्राचे अनेक बातमीदार त्यावेळी हिंदुस्थानात आले होते; त्यापैकी 'डेली हेरल्ड' पत्राचे बातमीदार मि. जॉर्ज स्लोकोम ह्यानी एक मार्ग विचारांति ठरविला. सरकारच्या परवानगीने त्यानी येरवड्यामध्ये म० गांधींची मुलाखत घेतली व नंतर, त्यानी स्वतः पाहिलेल्या चळवळीच्या दृश्याचे आपल्या वर्तमानपत्रातून खरमरीत पुरस्करण केले. यावेळी इंग्लिश सत्ताधारी जागे झाले.

मध्यंतरी दडपशाहीचा वरवंटाही बराच फिरविण्यात आला होता. पण, कशाचाही परिणाम न होता चळचळ सारखी फोफावतच होती.

अखेर, मि. जॉर्ज स्लोकोम, श्री. जयकर, श्री. सप्रू, पं. मोतीलाल व जवाहिरलाल नेहरू, सौ. सरोजिनी नायडू, श्री. वल्लभभाई पटेल आणि म. गांधी यांच्या सहविचाराने लौकरच एक योजना तयार झाली.

गव्हर्नर जनरलने ता. २५ जानेवारी १९३१ रोजी एक पत्रक प्रसिद्ध करून व 'शांततामय परिस्थिति प्रस्थापित करण्याची आशा पूर्ण व्हावयाची असेल तर त्या गोष्टीशी संबंध असलेल्या व्यक्ति विनशर्त मुक्त असावयास पाहिजेत' म्हणून म० गांधीजीसह कॉ. च्या वर्किंग कमिटीचे सर्व सभासद सोडून दिले.

हा वेळपर्यंत, सरकारच्या इच्छेप्रमाणे बोलावण्यात आलेली गोलमेज (राऊंडटेबल) परिषद आपल्या कार्यक्रमातून मोकळी झाली होती. या परिषदेस राष्ट्रीय व्यक्ति कोणीच (काँग्रेससंमत) हजर नव्हती आणि चळवळ करणार तर काँग्रेस! अर्थात्, गांधी—आर्यविन—करारानंतर दुसरी परिषद भरविणे भाग झाले.

"दे वाण घे वाण' अशी म० गांधीजीबरोबर इंग्रज—सरकारचे हिंदुस्थानवरील मुख्य अधिकारी व्हाइसरॉय लार्ड आयर्विन यांसी तडजोड होऊन समेट झाला.

काँग्रेसचे कार्य थांबविण्यात आले. सरकारच्या दडपशाहीला गवसणी घालण्यात आली (निदान तसा भास तरी दाखविण्यात आला). हिंदुस्थानच्या राष्ट्रीय—सभेचे एकमेव प्रतिनिधि म्हणून म० गांधींची लंडन येथे भरणाऱ्या दुसऱ्या गोलमेज परिषदेकरिता निवड करण्यात आली.

ठरल्याप्रमाणे म० गांधीजी, श्री. महादेवभाई देसाई, श्री. देविदास गांधी, मि. प्यारेलाल, मीरा बेन आणि सौ. सरोजिनी नायडू यांचे समवेत इंग्लंडला पोहोचले.

गोलमेज—परिषदेचे काम सुरू झाल्यापासून संपेपर्यंत कमिटीच्या बैठकीत म० गांधींची एकंदर नऊ व्याख्याने महत्त्वाची झाली. त्या प्रत्येक वेळेला 'काँग्रेस व तिचे कार्य' अर्थात् 'हिंदुस्थानचे स्वातंत्र्य' या बाबतीत त्यांनी शक्य त्या शब्दाने कमिटीचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आणि शेवटच्या आभार प्रदर्शनात—आपल्या मनावर झालेला परिणाम त्यांनी बोलून दाखविलाः

" ...यापुढे आपले मार्ग भिन्न होणार आहेत. ......भिन्न मार्गासाठी आम्ही आता एकमेकांचा निरोप घेणार असलो तरी, प्रधानसाहेब, मी आपले अंत:करणपूर्वक आभार मानीत आहे......

काँग्रेसने कार्यक्षेत्रात प्रवेश केला व इतिहासात अविश्रुत अशा सविनय कायदेभंगाच्या अभूतपूर्व मार्गाचा अवलंब केला. मी एका तटाशी टक्करा घेतो आहे हे मला माहीत आहे. जगातील कोणतेही सरकार सविनय कायदेभंगाची गय करणार नाही असे मला सांगण्यात आले. सरकाराने त्या विरुद्ध खुशाल अकांडतांडव करावे. उघड उघड बंडसुध्दा कोणत्याही सरकारला परवडले नाही. सविनय कायदेभंगाबद्दल कोणत्याही सरकारला कितीही चीड आली तरी या सामर्थ्यापुढे त्याही सरकारला मान वाकवावी लागेल; याचे प्रत्यंतर स्वत: ब्रिटिश सरकारच आहे.

आठ वर्षे अव्याहत विरोध करून डॅनिश सरकारलाही या सामर्थ्यापुढे अशीच हार खावी लागली.

परंतु,...मी आपणास सुचवू इच्छितो की, याच चळवळीच्या सामर्थ्यापुढे मान वाकविण्याचे प्रसंग येतात. आज आपले मार्ग भिन्न होत असताना या चळवळी दडपून टाकण्याचा मार्ग आपणास मोकळा असला तरी आपण हे लक्षात ठेवा की, या चळवळी दडपून टाकण्याचा काळ निघून गेला आहे. त्या चळवळी नामोहरम करता येणे आता शक्य राहिले नाही.

...अजून वेळ गेली नाही. वाळूच्या घड्याळात थोडी वाळू अद्यापही शिल्लक आहे. काँग्रेसचे ध्येय आपण समजावुन घ्यावे अशी माझी इच्छा आहे. मी स्वत: व काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सर्व सभासद, तुमची इच्छा असल्यास, आमचे प्राण तुम्हास अर्पण करावयास तयार आहो. परंतु, त्याचबरोबर आपण हे ही लक्षात ठेवा की लक्षावधि-कोट्यावधि-दिन हिंदी प्रजेचे प्राण आपल्या हातात आहेत. मला शक्य असले तर त्या दीन दुबळ्यांचे बलिदान थांबवावे अशी माझी इच्छा आहे...."

...जोपर्यंत पारतंत्र्याची कुऱ्हाड कोणत्याना कोणत्या रूपाने समाजाचे तुकडे करून जातीजातींची शकले करीत आहे, आणि वर्गावर्गात दुही माजवीत आहे, तोपर्यंत कोणतीही सलोख्याची योजना निघणे शक्य नाही हे मी वारंवार सांगत आलो आहे. पारतंत्र्यात सलोख्यासाठी केलेल्या योजना या केवळ कागदी योजना ठरतील. परंतु, तेच हे पारतंत्र्याचे घरभेदी हत्यार दूर झाले की एक-राष्ट्रीयत्वाची भावना, सर्वांमध्ये कौटुंबिक प्रेम व ओढा ही दिसू लागतील. या भावनाना काहीच किंमत नाही असे आपणास वाटते काय? हिंदु, मुसलमान, शीख हे असेच पहिल्यापासून एकमेकाशी भांडत होते, अशी तुमची कल्पना आहे....

...माझे सहकार्य चालू ठेवणे किंवा न ठेवणे माझ्या हातात नसून सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे; तुमच्यावर अवलंबून आहे असेही म्हणता येणार नाही. ज्या परिस्थितीवर तुमचे किंवा माझेही नियंत्रण नाही त्या परिस्थितीवर या गोष्टी अवलंबून आहेत......

...आपल्या क्षमाशील वृत्तीबद्दल मी आपले आभार मानतो."

या नंतर परिषदेच्या कामाचा त्यांचा संबंध संपला आणि लंडन येथून निघण्यापूर्वी. त्यानी ता. ५-१२-१९३१ ला कॉं० च्या स्वातंत्र्य-मागणीसंबंधात पुढीलप्रमाणे-आशयपूर्ण-जाहिरनामा प्रसिद्ध केला:

## कॉंग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी

"कॉंग्रेसचे संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय कायम आहे. त्या संपूर्ण स्वातंत्र्यात, लष्कर, परराष्ट्रीय कारभार, आर्थिक व्यवहार या बाबत अनिर्बंध स्वातंत्र्य, ब्रिटन बरोबर समान दर्जाची स्वयंस्फूर्त भागीदारी व भागीदारी ठेवणे किंवा सोडणे बाबत समयस्वातंत्र्य या गोष्टींचा समावेश होतो.

## आवश्यक संरक्षके

हिंदुस्थानच्या हितास आवश्यक अशीच संरक्षके (सेफ्गार्डस) मान्य करण्याची कॉंग्रेसची तयारी. राष्ट्रीय कर्जाची व इतर देण्याघेण्याची

संरक्षण !

निःपक्षपाती लवादाकडून चौकशी झाल्यावर जो भाग कायदेशीर ठरेल त्याची जबाबदारी स्वीकारण्याची काँग्रेसची तयारी आहे.

मराठा ... ग्रंथ संग्रहालय ... ग्रंथ

## स्वतंत्र प्रतिनिधीत्व

अल्पसंख्यांकांचा प्रश्न सोडविताना—केवळ राष्ट्रहिताच्या दृष्टीने—मुसलमान व शीख यांच्यासाठी कायदेमंडळात स्वतंत्र जागा राखून ठेवण्याच्या तत्त्वास अपरिहार्य संकट म्हणूनच काँग्रेस संमति देईल.

## अस्पृश्यांचा प्रश्न

अस्पृश्यांचा कैवार हे काँग्रेसचे जिव्हाळ्याचे कर्तव्य आहे आणि त्याना विभक्त ठेवणे व अशा रीतीने अस्पृश्यतेला कायमचे स्थान देणे अत्यंत अन्यायाचे आहे.

## खास हक्कदारी

जात, धर्म किंवा वर्णमूलक भेदावर कोणाचीही पात्रापात्रता ठरविली जाणार नाही. वयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस मतदानाचा हक्क देण्याची पद्धति काँग्रेसने स्वीकारली असल्यामुळे अल्पसंख्यांक मतदारसंघाच्या प्रतिनिधीला राष्ट्रसेवेच्या सामर्थ्यावर का. मं. ( कौन्सिल ) मध्ये निवडून येण्याचा राजमार्ग पूर्ण मोकळा आहे. ”

विलायतेच्या या मुक्कामात म. गांधीनी अनेकांच्या भेटी—मुलाखती घेतल्या. गो. मे. परिषदेशिवाय अनेक ठिकाणी कारणपरत्वे व्याख्याने देऊन हिंदुस्थानविषयक सहानुभूति उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. सम्राट—बादशहांचीसुद्धा मुलाखत घेतली. या वेळचे त्यानी आपले वास्तव्य अत्यंत दरिद्री अशा वसतीतील ‘किंग्स्ले’ हॉलमध्ये ठेवले होते. तेथून निघाल्यानंतर जवळ जवळ तेवीस दिवसानी म्हणजे ता. २८ डिसेंबर १९३१ रोजी ते मुंबईस परत आले.

× × ×

म. गांधी आणि लॉर्ड आयर्विन यांच्यात करार झाला होता की, “ कायदेभंगाची चळवळ थांबवावी व योग्य त्या मार्गाने गोलमेज परिषदेत

काँग्रेसने भाग घ्यावा. याच्या मोबदला सरकारने सर्व प्रकारची दडपशाही मागे घ्यावी व शक्य तो जनतेचे नुकसान करू नये व केलेले शक्य तो भरून द्यावे."

परंतु, हा करार सरकारतर्फेने बिलकूल पाळण्यात आला नाही. धर-पकड चालू ठेविली. लोकांच्या मालावरील जप्त्यांचे सत्रही तसेच ठेवले. याचवेळीं, लार्ड आयर्विन ह्यानी १८ एप्रिल १९३० ला हिंदुस्थानातून बाहेर पाऊल काढले; त्याच्या आधलेच दिवशी हिंदुस्थानचे व्हाइसरॉय म्हणून लार्ड विलिंग्डन यांची नेमणूक झाली होती. गांधी-आयर्विन-करार कागदात राहून सोटेशाही सत्ता मुक्त आवेशाने थैमान घालू लागली. नाव घेण्या-सारखे बहुधा सर्व पुढारी तुरुंगात टाकण्यात आले व बाकी उरलेले कधी पकडले जातील याचा भरवसा नव्हता.

गोलमेज परिषदेहून हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर येऊन आठ दिवस-सुद्धा पुरते झाले नाहीत; तोच ता. ४ जानेवारी १९३२ च्या पहाटे म. गांधींना व सरदार वल्लभभाई पटेल याना अटक झाली.

दडपशाहीच्या भयंकर धुडगुसामुळे या वेळी हिंदुस्थानभर भीषण अशी स्मशानशांतता पसरली होती.

म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु, श्री. राजगोपाळचारिअर; पं. मदन मोहन मालवीय, श्री. शेरवाणी श्री. पुरुषोत्तमदास टंडन, सरहद्द गांधी व त्यांचे बंधु डॉ. खान, श्री. बाबू राजेंद्रप्रसाद, श्री. वल्लभभाई पटेल, श्री. अणे, डॉ. अन्सारी, सरदार शार्दूलसींग कवीश्वर, श्री. गंगाधरराव देशपांडे, डॉ. किचलू, श्रीमती नेली सेनगुप्त, श्रीमती स्वरूपराणी नेहरु इ. काँग्रेसचे सर्व प्राणाधार सरकारने आपले आश्रित बनविले होते.

× × × ×

गोलमेज-परिषदेमध्ये स्वतंत्र-मतदार-संघात-अस्पृश्यांचा वर्ग-सवर्ण हिंदुपासून अलग करून-सामील करण्याचा प्रयत्न झाला होता. त्याला म० गांधींनी प्राणांतिक उपोषणाच्या 'पणा'ने विरोध केला होता. मतदान, हक्क व प्रातिनिधिक जागांचे प्रमाण ठरविण्याबाबत लोकमत अंदाजण्याकरिता

१७ जानेवारीला लॉर्ड लोथियन यांची कमिटी दाखल झाली. 'या कमिटीचा रिपोर्ट तयार झाल्यानंतर त्यावर सरकारही आपला निर्णय कदाचित जाहीर करून मोकळे होईल ' या कल्पनेमुळे 'अगोदरच काही तरी प्रयत्न करावयास पाहिजे ' म्हणून म० गांधींनी ' ब्रिटिश-प्रधान-मंडळा'चे एक प्रमुख नेते सर सॅम्युअल होअर याना एक पत्र लिहीले. त्याचा थोडक्यात आशय असा:

येरवडा सेंट्रल प्रिझन,

११ मार्च १९३२.

प्रिय सर सॅम्युअल,

अस्पृश्यवर्गाला स्वतंत्र मतदार संघ देण्यात आल्यास त्या गोष्टीचा मी प्राणांतिक प्रयत्न करून प्रतिकार करीन असे गोलमेज-परिषदेच्या प्रसंगी भाषण करताना शेवटी मी बोललो होतो हे आपल्याला आठवत असेल!... माझ्या भाषणाला अनुसरून अस्पृश्यांच्या बाबतीत तरी स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्यात येऊ नयेत, याबद्दल सर्व देशातील लोकमत एकीकृत करावे, असा माझा हेतू होता......

...कायदेमंडळात त्यांचे प्रतिनिधि असावे, या बाबतीत माझा विरोध नाही. इतरांच्या बाबतीत मतदानाचा हक्क कडक स्वरूपाचा असला तरी अस्पृश्यांच्या बाबतीत तो ढिला असावा व शिक्षण, मालमत्ता वगैरेचा मुळी-सुद्धा विचार न करता या समाजातील प्रत्येक वयात आलेल्या स्त्री-पुरुषांचे नाव मतदारांच्या यादीत नोंदण्यात यावे, असे माझे मत आहे. ...स्वतंत्र मतदारसंघामुळे या समाजाची किती हानी होईल, हे समजून घ्यावयाचे असल्यास सवर्ण हिंदूत ते कसे वाटले गेले आहेत व त्यांच्यावर ते किती अवलंबून आहेत, याचे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे...

...म्हणून अस्पृश्य वर्गाकरिता स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याचे ठरविण्यात आल्यास मी प्राणांतिक उपवास केल्याशिवाय राहणार नाही...

...तुम्ही या पत्राचा कसाही उपयोग करू शकता.

एम. के. गांधी.

या बाबत बरीच भवति न भवति होऊन अखेर २० सप्टेंबरला म० गांधींना आपला निश्चय जाहीर करावा लागला. मि. होअर, मि. मॅक्डोनाल्ड यांच्याबरोबर केलेल्या पत्र-व्यवहारामध्ये काही एक निर्णय झाले नाही. ही सारी पत्रे नंतर प्रसिद्ध करण्यात आली.

उपवास चालू होताच या टोकापासून जगाच्या दुसऱ्या टोकापर्यंत नुसता हाहाकार उडून गेला. जो तो चिंतेत पडला. कोणी कोणी त्या दिवशी उपवास केला व म० गांधींवरील आपली सहानुभूति प्रगट केली, भेटी-मुलाखतींबद्दल चहुकडून पुस-तपास होऊ लागले. हा दिवस सर्व देशभर प्रार्थना करण्यात आणि म० गांधीवरील प्रेम-सहानुभूतिच्या-चर्चा करण्यात गेला.

याच वेळी पं. मदनमोहन मालवीय हे पुढे आले व त्यांनी एक परिषद बोलाविली. परिषदेच्या कार्यक्रमात योग्य तो विचार सुरू करण्यात आला व संयुक्त मतदारसंघांतर्गत अस्पृश्य-वर्गाच्या हिताच्या दृष्टीने एक करार तयार करण्यात आला. ह्या कराराप्रमाणे साम्राज्य-सरकारने राज्यघटनेत फेरफार केल्यास म० गांधींना प्राणांतिक उपोषणाचे पारणे फेडतां येणार होते. ब्रिटिश-प्रधान-मंडळाने ह्या कराराला संमति दिली व त्याप्रमाणे हिंदुस्थान व इंग्लंड येथे वर्तमान-पत्रातून जाहीर करण्यात आले.

चोहिकडे आनंदी आनंद झाला. करारावर प्रसिद्ध व प्रतिष्ठीत अशा स्पृश्यास्पृश्य-वर्गीय पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. ता. २६ ला पं. हृदयनाथ कुंझरू व श्री. राजगोपाळाचारियर यांच्या सायाने व विचाराने म० गांधींनी उपासाचे व्रत सोडले. ह्या करारालाच 'पूना-पॅक्ट' असे नाव पडले.

\+ + +

हा 'करार' म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासाचा थोडासा भागच होऊन बसला आहे. आणि म्हणून त्याबाबत जरा ठळक माहिती देणे अत्यावश्यक आहे.

'करार' होण्यापूर्वी म. गांधींनी अनेक हरिजन-पुढाऱ्यांबरोबर समक्ष व पत्रद्वारे विचारविनिमय केला. श्री. राजभोज यांच्या ता. २०-९-३२ च्या पत्रात तर त्यांनी आपले अंतःकरण अगदी उघड करून लिहिले होते. थोडक्यात 'करारा'चे स्वरूपः

## पुण्यातील स्पृश्यास्पृश्य-करार

पुणे ता. २४ सप्टेंबर १९३२

पं. मदन मोहन मालवीय यांच्या निवासस्थानात आज रोजी दुपारी तीन वाजता अस्पृश्यांच्या प्रतिनिधित्वाचा संयुक्त मतदारसंघाच्या तत्वावर रचलेला पुढील करार सर्व पुढाऱ्यांच्या संमतीने मुक्रर करण्यात आलाः

(१) अस्पृश्यांना सर्वसाधारण मतदारसंघात सर्व प्रांतात मिळून लोकसंख्येच्या प्रमाणात १४८ राखीव जागा पुढीलप्रमाणे द्याव्या.

| प्रांत | अस्पृश्यांना जागा | कायदेमंडळातील हिंदूंच्या जागा. |
|---|---|---|
| बंगाल | ३० | ८० |
| मुंबई सिंधसह | १५ | १०८ |
| बिहार व ओरिसा | १८ | ११४ |
| मद्रास | ३० | १५२ |
| पंजाब | ८ | ४३ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | २० | ८८ |
| आसाम | ७ | ५७ |
| संयुक्त प्रांत | २० | १४४ |
| | १४८ | ७८७ |

अशा तऱ्हेने या समेटान्वये अस्पृश्यांना हिंदूंच्या एकंदर ७८६ जागांपैकी १४८ जागा देण्यात येणार आहेत.

( २ ) या सर्व राखीव जागाकरिता अस्पृश्यांचे जे प्रतिनिधी निवडावयाचे त्यांची प्राथमिक निवड प्रथम केवळ अस्पृश्यवर्गीय मतदारानी प्रत्येक जागेकरिता ४ उमेदवार याप्रमाणे निवडलेल्या उमेदवारातून केली जावी व तदनंतर या चारांच्या पॅनेलमधून एक प्रतिनिधी स्पृश्यास्पृश्य सर्व मतदारानी निवडून द्यावा. प्राथमिक निवडणुकीत प्रत्येक अस्पृश्यवर्गीय मतदारास एकच मत देण्याचा अधिकार आहे.

( ३ ) मध्यवर्ती कायदेमंडळात अस्पृश्यांचे प्रतिनिधि सर्वसाधारण मतदारसंघात राखीव जागासाठी पॅनेलच्या निवडणुकीने निवडले जावे.

( ४ ) मध्यवर्ती कायदेमंडळात ब्रिटिश हिंदुस्थानातील अस्पृश्याना हिंदूंच्या जागापैकी १८ टक्के जागा द्याव्यां.

( ५ ) अस्पृश्य उमेदवारांच्या पॅनेलची ही पद्धति फक्त १० वर्षेच अमलात रहावी. पण तत्पूर्वी सर्व जातीनी एकमताने ती रद्द करावयाचे ठरविल्यास तसे करण्यास हरकत नाही.

( ६ ) राखीव जागांचे तत्त्व सर्व जातींत एकवाक्यता होऊन रद्द होईपर्यंत अमलात रहावे.

( ७ ) प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळावरील अस्पृश्यांचा मताधिकार लोथिअन कमिटीच्या रिपोर्टातील शिफारशीप्रमाणे असावा.

( ८ ) स्थानिक संस्थात निवडणूक किंवा सरकारी नोकऱ्यात नेमणुका या बाबतीत अस्पृश्यावर कोणतीही नालायकी अस्पृश्यतेच्या मुद्यावर असू नये व त्याना योग्य प्रमाणात जागा द्याव्या.

( ९ ) अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी योग्य प्रमाणात प्रांतिक सरकारच्या बजेटात तरतूद करावी.

| | |
|---|---|
| पं. मदन मोहन मालवीय | सर तेजबहादूर सप्रू |
| बॅ. एम्. आर. जयकर, | डॉ. आंबेडकर |
| रा. ब. श्रीनिवासन | रा. ब. राजा |

| | |
|---|---|
| डॉ. सोळंकी | श्री. पी. बाळू |
| श्री. पां. ना. राजभोज | श्री. जी. ए. गवई |
| सर चुनीलाल मेहता | श्री. सी. राजगोपालाचारियर |
| बाबू राजेंद्रप्रसाद | श्री. घनश्यामदास बिर्ला |
| श्री. रामप्रसाद बिर्ला | श्री. शंकरलाल बँकर |
| श्री. बी. एस्. कामत | श्री. जी. के. देधवर |
| श्री. अमृतलाल ठक्कर | श्री. आर. आर. बखले |
| श्री. गोविंद मालवीय | श्री. देवीदास गांधी |
| श्री. विश्वास | श्री. देवीदास जाटव |

समेटाची वाटाघाट संपून तडजोड झाल्यावर श्री. राजगोपालाचारी व श्री. देवीदास गांधी यानी महात्माजीना ती बातमी कळविली. नंतर पुढाऱ्यांच्या परिषदेमार्फत पं. मालवीय व डॉ. आंबेडकर यांच्या सहीने मुख्य प्रधानाकडे या समेटाची एक तार पाठविण्यात आली. सायंकाळी सर चुनीलाल मेहता व डॉ. आंबेडकर यांनी मुंबई सरकारचे गृहमंत्री ना. हडसन यांचेकडे समेटाचा मसुदा नेऊन दिला.

या समेटाबद्दल सर्व पुढाऱ्याना संतोष वाटत असून, ही तडजोड खरोखरीच उत्तम झाली व जागांच्या वाटणीसंबंधात श्री. ठक्कर व श्री. बखले या सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या सभासदांचे परिश्रम फारच महत्त्वाचे झाले असे सर्वांना वाटत आहे.

× × × ×

मलबारमधील गुरुवायूरच्या मंदीर-प्रवेशाबाबत-अस्पृश्यतानिवारणाच्या कारणाने-म० गांधींनी असाच एकवीस दिवसांचा उपवास केला होता. त्यांच्या अगोदर काही दिवस बरीच प्रसिद्ध प्रसिद्ध मंडळी त्यांच्याशी सल्ला-मसलत करण्याकरिता येत असे. अशा एका प्रसंगी म० गांधींनी पुढीलप्रमाणे उद्गार काढलेः

" अस्पृश्यतेचा डाग आहे तसाच कायम राहिला तर जगण्यात तरी काय हशील ? अस्पृश्यता नाहीशी होणार असे मला खास वाटते. कारण, त्याप्रमाणेच ईश्वरी योजना घडून येत आहे. मी परमेश्वराचा प्रेषित आहे. प्रत्येक सद्भक्त परमेश्वरी संकेतानुसारच कार्याची योजना ठरवतो. परमेश्वरी योजनेमुळेच मी उपोषणास प्रवृत्त झालो आहे.

मी ईश्वराचा पाईक आहे. त्याच्या प्रेरणेप्रमाणे मी वागतो. हिंदु-धर्मावरील कलंक धुवुन काढण्याकरिता मी माझे शीर हातावर घेऊन स्पृश्य-वर्गीयांची मने वळविण्यास उद्युक्त झालो आहे.

मी भयंकर महत्त्वाकांक्षी आहे. माझ्या हातून हे मोठे कार्य घडून यावे या करिताच परमेश्वराने मला बुद्धि व भाषा दिली आहे.

ईश्वराचा संदेश जनतेच्या मनःपटलावर पटविण्याचे कार्य मला केलेच पाहिजे...... "

× × × ×

पुढे, देशात कायदेभंगाच्या चळवळीबद्दल बरीच अनास्था उत्पन्न झाली. कारण कोणतेही कार्य विघ्नाशिवाय घडेनाच. सगळ्याना कंटाळा आला. कौन्सिलवादी मंडळीच्या प्रयत्नाने काँग्रेसचा बाहेरचा कार्यक्रम शक्य तो चालू ठेऊन कौन्सिलात प्रवेश करण्याचे ठरले. पुढील कारणपरंपरा सांग-ण्यापूर्वीच सांगावयाचे तर म. गांधींना हे न पटणारे असल्यामुळे त्यांनी राजकारणापासून, काँग्रेसमधून स्वतःला अलग करून घेतले व स्वतःच्या कल्पनेप्रमाणे 'ग्रामोद्योगा'च्या चळवळीला व्यक्तिगत हात घातला. तरीसुद्धा वेळप्रसंगी काँग्रेस कमिटीला त्यांच्या सल्लामसलतीचा आधार घ्यावा लागतो व तो, ते आपले मुख्य कर्तव्य म्हणून मोठ्या आनंदाने देतात. नव्हे अजू-नही त्यांच्या विचारावरच काँ. कमिटी आपल्या विचारशक्तिचा पांगुळगाडा रेटीत असते.

गेल्या मार्च १९३७ च्या कायदेकौन्सिलच्या निवडणुकीत काँ. ला-लाच यश मिळाले. ता. १ एप्रिलपासून नवीन राज्यघटना अमलात आली.

त्यावेळी प्रांतिक मंत्री-मंडळे तयार करण्याकरिता गव्हर्नर जनरलने कॉंग्रेस-पार्टीला आमंत्रण दिले होते. पण कॉं. कमिटीच्या वर्किंग कमिटीने ठरविल्या-प्रमाणे 'आश्वासन' देण्याचे सरकारने टाळल्यामुळे कॉं. कमिटीच्या सभा-सदीय पुढाऱ्यांनी ते स्वीकारले नाही. या बाबतीत सर्व प्रकारची सल्लामसलत म० गांधींचीच आहे.

प्रांतिक-मंडळे बनविण्याचे कॉंग्रेसने सोडल्याबरोबर अल्पसंख्यांक कोणत्याही पक्षाने पुढे घाव मारली नाही. अखेर सरकारनेच या कामी स्वतःचा विचार चालविला आणि तात्पुरती मंत्री-मंडळे स्थापून कार्य चालविले.

"बुद्धि ही मनुष्यमात्राला मिळालेली एक ईश्वरी देणगी आहे आणि जगातील यच्चावत मानवजातीच्या उद्धाराकरिता व माणुसकीचा बचाव करण्याकरिता तिचा जास्तीत जास्त उपयोग करणे, हा खरा तिचा सदुपयोग आहे ! बुद्धिचा सदुपयोग, हे माणुसकीच्या मोठेपणाचे मुख्य लक्षण आहे जगामध्ये 'महान-पद' प्राप्त होते ते असल्याच सुलक्षणी व्यक्तिमात्रांना !"

---


महाराष्ट्रीय हरिजन-समाजाचे एकच

मुख-पत्र

# दलित-बंधु

संपादक—पांडुरंग नाथुजी राजभोज.

'हिंदु-समाजाच्या अंतर्बाह्य सुखदुःखात आपलेहि सुखदुःख अवलंबून आहे' हे जाणून संपूर्ण राष्ट्रीय आणि हरिजनसमा-जाच्या हिताच्या दृष्टीने-निर्भीड विचारांचा प्रचार करणारे साप्ताहिक वर्तमान-पत्र.

वार्षिक वर्गणी २॥ रु. (टपाल खर्चासह)

व्यवस्थापक:—'दलित-बंधु' घोरपडे पेठ, पुणे नं. २.

५५८

* * * * * * * *

परिस्थिति उत्पन्न होण्यास जरी आपण कारणीभूत नसलो तरी ती सुधारण्यास आपल्या हातून शक्य तेवढे प्रयत्न करणे हे प्रत्येक मनुष्याचे व्यक्तिदृष्ट्या आणि सार्वजनिक दृष्ट्या कर्तव्य आहे, पवित्र कर्तव्य आहे, असा शास्त्राचा आणि धर्माचाहि सिद्धांत आहे. ज्या योगाने जगाचे, धारणपोषण होते त्याला धर्म असे म्हणतात आणि जगाचे धारणपोषण म्हटले म्हणजे त्यात सद्यःकालीन परिस्थिति सुधारून ज्या योगे ती परिस्थिति वरवरच्या पायरीला जाऊन अखेर पूर्णावस्थेला पोचेल त्या त्या सर्व गोष्टी करणे, करविणे, स्वतः करणे आणि लोकाकडून करविणे याचा प्राधान्येकरून समावेश होतो.

आपला जन्म कोणत्याही देशात झालेला असो, तो केवळ आपण त्या देशातील अन्न खाऊन आमरणात आपल्या बायकामुलांसह चैनीत राहण्यासाठी नाही, यापेक्षा काही तरी उच्चतर ध्येय सिद्ध करण्याकरिता आहे, ही गोष्ट शास्त्रकार आणि धर्मकार यां दोहोसही पूर्णपणे मान्य आहे. या उच्चतर ध्येयांची मर्यादा इतकी श्रेष्ठ आहे की, मनुष्य या मार्गाने जाता जाता अखेर त्याला ह्या जगाचे पालनपोषण करणाऱ्या परमेश्वराचे तादात्म्य प्राप्त होते. म्हणजे तो देवपणा पावतो, असे शास्त्रातून वर्णन आहे. परंतु शास्त्र आणि धर्म या दोहोंच्याही आज्ञा जरी अशा प्रकारच्या आहेत तरी या ध्येयाकडे आमच्या देशातील लोकांचे जितके लक्ष लागावे तितके लागले नव्हते असे मोठ्या दुःखाने म्हणावे लागते. एरवी सध्यांची परिस्थितीच उत्पन्न झाली नसती. पण पूर्वकाली ह्या गोष्टीकडे देशातील कर्त्या पुरुषांचे जावे तितके लक्ष गेले नाही म्हणून प्रस्तुत काली आम्हीही तो मार्ग स्वीकारू नये असे होत नाही. देशाच्या उन्नतीसाठी जे काही प्रयत्न करावयाचे त्याला कालाची काही विशिष्ट मर्यादा असते असे नाही. पूर्वीच्यानी असे प्रयत्न केले नसले तर पुढच्या लोकानी करू नये असे नाही. आज केले नाहीत तर उद्या करू नये असे नाही. आणि उद्या केले नाहीत तर परवा करू नयेत असेही होत नाही. अशा तऱ्हेचे प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे......म. गांधींच्या चरित्रावरून जो काही बोध घ्यावयाचा त्यापैकी मुख्य बोध हा होय.

—लोकमान्य टिळक.

# द. कृ. सांडू

## ब्रदर्स

यांचे

## ओरिजनल

# ब्राह्मी तेल

मेंदूचे विकार व डोके दुखणे
यावर वापरा!

द. कृ. सांडू ब्रदर्स — कारखाना, चेंबूर.

दुकान व दवाखाना: ठाकुरद्वार, मुंबई.

— शाखा —

१ पोयबावडी, परेल,

२ लेडी जमशेटजी रोड, (दादर) मुंबई

घरात मुंबई

म्हणजेच

# बेडेकर

# यांचे मसाले

आज घरोघर बेडेकर यांचेच मसाले वापरले जातात ते त्यांच्या गुणामुळेच! बेडेकर यांचे मसाले वापरल्याने स्वयंपाक अत्यंत रुचकर व खमंग होतो.

एकवेळ प्रत्येकाने अनुभव घेऊन
खात्री करून घ्यावी.

पत्ताः—

व्ही. पी. बेडेकर अँड सन्स, मुगभाट, मुंबई नं. ४.

शाखाः—

मुंबई : १ ठाकुरद्वार, २ फोर्ट, ३ पोयबावडी, ४ दादर.

हिंदुत्वासाठी, हिंदुस्थानासाठी, हिंदुसंस्कृतिसाठी

हिंदुसंघटन, हिंदुसंरक्षण, हिंदुसंवर्धन

याप्रमाणे कार्यभाग साधणाऱ्या

# महाराष्ट्र-विद्याशाळा

## या संस्थेच्या मदतीकरिता

# ज्ञान-कथा-माला

या 'माले'तून दरमहा एक, याप्रमाणे वर्षातून बारा पुष्पे—पुस्तके प्रसिद्ध होतात.

किरकोळ पुस्तकाची किंमत दोन आणे.

प्रत्येक पुस्तकात, युग व धर्म—पंथ—प्रवर्तक अशा थोर विभूतींचा प्रमुख, आणि त्यांच्या प्रभावळीतल्या व्यक्तिंचा थोडक्यात कथात्मक परिचय देण्यात येतो.

**महान...?...मनुष्यजातीचा संरक्षक !**

(किंमत चार आणे) 'माले'च्या वर्गणीदारास बक्षीस.

## वर्गणीचे दर

| | | |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | (टपाल खर्चासह) | १। रुपया |
| पंचवार्षिक वर्गणी | ( ,, ,, ) | ५ रुपये |
| तहहयात [एकदाच] | ( ,, ,, ) | २५ रुपये |

व्यवस्थापकः—ज्ञान-कथा-माला, मु॰ बोपोडी, पुणे नं. ३.


## मुलामुलींना
# बक्षीस देण्यासारखी योग्य पुस्तके
( शाळाखात्याने मंजूर केलेली )

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिमुकली इसापनीति | लेखक | राम गणेश गडकरी | किं. | ८२ |
| २ | बालसुभाषित ... | ,, | भिकाजी वि. महाजन | ,, | ८३ |
| ३ | गाणी व संवाद ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८५ |
| ४ | बालादर्श ... | ,, | सिद्ध रामदास | ,, | ८३ |
| ५ | हिंदकन्या ... | ,, | ,, ,, | ,, | ८२ |
| ६ | हिंदकला ... | ,, | ,, ,, | ,, | ८१ |
| ७ | ना. गोखले (चरित्रे) | ,, | भाऊ श्रीधर कुलकर्णी | ,, | ८४ |
| ८ | स्वामी विवेकानंद ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८४ |
| ९ | बाल बंकिमचंद्र ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८४ |
| १० | शिशिर कुमार घोष ... | ,, | पांडुरंग स. साने | ,, | ८४ |
| ११ | बेंजामिन फ्रँकलिन ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८४ |
| १२ | रविंद्रनाथ टागोर ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८४ |
| १३ | संत एकनाथ ... | ,, | लक्ष्मण ना. जोशी | ,, | ८४ |
| १४ | संत ज्ञानदेव ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८४ |
| १५ | संत नामदेव ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८४ |
| १६ | बाळाजी विश्वनाथ ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८६ |
| १७ | बाजीराव बल्लाळ ... | ,, | ,, ,, ,, | ,, | ८८ |
| १८ | स्वामी रामतीर्थ ... | ,, | दत्ताग्रज | ,, | ८४ |
| १९ | सर ऐझॅक न्यूटन ... | ,, | प्रो. पारसनीस एम. ए. | ,, | ८४ |
| २० | कर्मवीर हेन्री फोर्ड ... | ,, | प्रो. पेंठे एम. ए. | ,, | ८१४ |
| २१ | चक्रवर्ती नेपोलियन ... | ,, | जगन्नाथ वि. बापट | ,, | ८८ |

ए. पी. बापट अँड ब्रदर्स, बुकसेलर्स, बुधवार पेठ, पुणे नं. २.

# महात्मा गांधींचा आशिर्वाद

स्थळ प्रत





येरवडा.

ता. १९-१-१९३३.

भाई उपासक,

तुम्हारा खत मिला। तुमने ठीक स्मरण दिलाया। मै योजना पढ गया है। वह योजनाका भाग कोई संस्थाही उठा सकती है। तुम्हारे तो जो पाठशाला चल रही है उसको स्थिर करनेमे और सुधारनेमे सब शक्तिका व्यय करना चाहिये। तुम्हारे बारेमे मैने बात करली है।

मोहनदास गांधी.

# निराश्रित आणि निरक्षर

## मुलामुलींसाठी

# महाराष्ट्र-विद्याशाळा

" ज्ञान-कथा-माले"च्या उत्पन्नावरच 'महाराष्ट्र-विद्याशाळे'चे कार्य चालत आहे. या 'शाळे'ची कल्पना व त्यावरील प्रसिद्ध व्यक्तिंचे अभिप्राय पुढे दिले आहेत.

## सप्रेम नमस्कार, विशेष.

जगामध्ये 'हा माझा देश' म्हणून हिंदुस्थानला अभिमानाने बोट दाखविण्याइतकी आज स्थिति राहिलेली नाही. धर्मांची शिथिलता आणि तदनुषंगिक अनेक पंथ व जाती, पक्षोपपक्ष हेच बहुधा या स्थितीला कारण झालेले आहे. संघटना असती तर ३० कोटीच्यावर मनुष्यसंख्येचा हिंदुस्थान गुलामगिरीचा पाश पत्करताच ना! याहीपेक्षा खडतर परिस्थिति म्हणजे ६ कोटी स्वदेशबांधवांची 'अस्पृश्यता' नष्ट करण्यास झालेला उशीर होय!

स्वदेशाच्या उद्धाराकरिता व उन्नतीकरिता ज्या काही चळवळी समाजाला कराव्या लागतात, त्यामध्ये स्वराज्याची किंबहुना स्वातंत्र्याच्या प्राप्तीची चळवळ फार महत्त्वाची आहे आणि आजला तीच प्रमुख आहे. देशाला स्वराज्य व समाजाला स्वातंत्र्य पाहिजे आहे, ते का? तर, दिवसानुदिवस वाढत चाललेल्या आपदांना आळा बसावा म्हणून! देशातली अस्वस्थता आणि ६॥ कोटी बंधुभगिनींची अस्पृश्यता नष्ट होणे अत्यावश्यक असून, त्याला सर्व संघटन, हा एक अत्युत्तम उपाय आहे. संघटनेच्या दृष्टीने विचार करता प्राथमिक शिक्षणाबरोबर धंदेशिक्षणाची सोय सुलभ होणे जरूर आहे.

तेव्हां, प्राथमिक शिक्षणाबरोबर औद्योगिक शिक्षणाची स्थापना आज जरूर आहे, त्या खालच्या–मागासलेल्या–अस्पृश्य वर्गांतील मुलामुलींना ते सुलभ तऱ्हेने व सोयीस्कर रीतीने देऊन त्यांना तयार करणे हे स्वाभाविक व प्रासंगिक ठरणारे आहे. कारण, पाठ–शाळेत भाषासरणी सुधारली जाऊन सोबतच्या धंदेशिक्षणामुळे मोठेपणी कोणालाही गावात बिनधोक प्रवेश मिळणे अडचणीचे नाही; आणि एकदा गावात सुखकर मार्गाने प्रवेश मिळताच, सहवासाचा परिणाम स्वच्छता व टापटीप यामध्ये घडून येऊन संस्कृति आणि रितीरीवाज सुधारण्यास उशीर लागण्याचा मुळीच संभव नाही.

आणि असे होऊ लागल्यावर सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक अशा भावना कोणाच्याही दुखविल्या न जाता घरावामुळे आपआपसात तंटे–भांडणेसुद्धा ( किंवा सत्याग्रहसुद्धा ) होण्याची भीति नाही. संघटनाला अस्पृश्यता–निवारण हे जरूर असल्यामुळे अस्पृश्यता–निवारणाला बौद्धिक आणि आर्थिक शिक्षण तितकेच महत्वाचे आहे.

परंतु, हे शिक्षण ज्या वर्गाला द्यावयाचे आहे, त्या वर्गाच्या निराश्रितावस्थेमुळे त्यांना ते उपाशी पोटी मुळीच घेतां येणारे नसल्यामुळे प्राथमिक शिक्षण व औद्योगिक शिक्षण मोफत करूनच्याकरून शिवाय अन्न–वस्त्रादि फ्री वसतिगृहाची योजना करावयाला पाहिजे. कारण उघडच आहे की 'आधी पोटोबा आणि मग विठोबा!' पोटातच काही नसले–किंवा काहीतरीच असले–तर डोक्यात राख भरणे काय कामाचे! खालच्या–मागासलेल्या वर्गावर शिक्षणाची सक्ति करावी लागणार आणि सक्तिच्या शिक्षणाला–बोर्डिंग व लॉजिंग'च्या व्यवस्थेशिवाय गत्यंतर नाही.

या कार्यास्तव जनतेने कृपाशिर्वादाचा पूर्ण पाठिंबा देणे जरूर आहे. परंतु; सार्वजनिक कार्य म्हटले की पैशाला फंड आलाच. आणि फंडाच्या अपेक्षेने कोणाच्या भेटीला जावे तर एखाद्या अनेकी कार्यकर्त्यांच्या गतकालीन पराक्रमाचे खापर आमच्या पुढे आदळण्यात येण्याचा संभव आहे. तेव्हां या

बाबतीत, आधिच प्रार्थना करून ठेवायची की—माफ करा! बाप वाईट निघाला म्हणून मुलगा त्याचाच बाप होईल हा न्याय येथे लावून इष्टकार्याची हेळसांड करू नका. कळावे, लोभ असावा, हे सविनय विनंती.

ता. २१ मे १९२९ } दत्ताराम रंगनाथ उपासक, लक्ष्मीबाई दत्ताराम उपासक,

"ज्या कारणामुळे अस्पृश्य जाति हिंदुसमाजाकडून दूर केल्या जातात, ते कारणच नष्ट करण्याचा स्तुत्य प्रयत्न श्री. उपासकांचा पाहून मनास फार आनंद झाला. याला मदत जितकी मिळेल तितकी थोडीच आहे.......लवकरच मी माझ्या गावी गेल्यानंतर यथाशक्ति मदत देईन." २१–५–१९२९.

अक्कलकोट–संस्थान. रामचंद्र बाळाचार्य अवधानी.

रा. रा. उपासक यानी ( आपली ) योजना मला समजावून सांगितली. या त्यांच्या प्रयत्नाला जी जी मदत करता येणे शक्य आहे ती ती आमचे अस्पृश्यता–निवारक मंडळ करील असे आश्वासन मी त्यास दिले आहे.

२१–५–२९. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

वरील कार्यास माझी सहानुभूती आहे, व सर्वांनी मदत करण्यासारखे ते कार्य आहे. २१–५–२९.

ल. ब. भोपटकर,

प्रतिसहकारपक्षाचे प्रसिद्ध पुढारी, एम्. ए., एल्. एल्. बी.

या सुधारलेल्या काळात अजूनही अस्पृश्यता नष्ट करण्याबद्दल प्रयत्न करणे जरूर वाटावे, हे दुर्दैव होय. माझी अल्प मदत रु. १ मी देतो. ता. २१–५–२९.

चालक—कॉंग्रेस खादी भांडार, पुणे. भोगीलाल जैनी.

श्री. द. रं. उपासक यांची योजना मला मान्य असून त्यांच्या कार्यास सक्रिय सहानुभूती म्हणून मी रु. ५ देत आहे. ता. २१–५–२९.

चालक—नवमतवादी तरुण मंडळ. ए. के. गायकवाड.

मराठी ग्रंथ संग्रहालय

" सार्वत्रिक आणि मोफत शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय अस्पृश्यांची उन्नति होणार नाही, पण त्याबरोबरच त्यांना धंदेशिक्षण मिळाल्याशिवाय त्यांचा जीवनक्रम सुलभ होणार नाही, हे रा. उपासकांचे विचार वाचून आनंद वाटला. त्यांच्या विचाराला चालना मिळावी व त्याना कार्य करण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सध्या रु. ५ मदत करीत आहोत; व त्यानी आपले कार्य नेटाने सुरू केल्यास हस्तेपरहस्ते मदत मिळवून देऊ."
ता. २२–५–२९.

सत्यशोधक व ब्राह्मणेतरांचे पुढारी } बाबूराव मारुतराव जेधे,
केशवराव मारुतराव जेधे.

" भारतीयांच्या उन्नतीसाठी ज्या अनेक चळवळी करणे जरूरीचे आहे त्यात अस्पृश्यता–निवारण ही एक महत्त्वाची आहे. श्री. उपासक यानी आरंभिलेल्या कार्यास माझी सक्रिय सहानुभूति आहे." ता. २२–५–२९

सेक्रेटरी कॉंग्रेस–कमिटी. पोपटलाल रामचंद शहा.

रा. रा. द. रं. उपासक यानी हाती घेतलेल्या कार्यास सढळ हाताने मदत केल्यास कार्य पार पडण्यास सुलभ होईल. तरी ( या ) कार्यास मदत करावी. आम्ही स्वतः रु. ३ दिले आहेत. कळावे; ता. २२–५–२९.

सेक्रेटरी—श्रीशिवाजी मराठा सोसायटी. के. जी. शिंदे.

आज हजारो वर्षांपासून धर्माच्या नावाखाली दडपून ठेवलेल्या अस्पृश्य समाजास थोडाफार हातभार लावून वर काढण्याची योजना रा. द. रं. उपासक यानी धैर्याने योजिलेली पाहून आनंद वाटला. रा॰ उपासक यानी आरंभलेल्या कार्यास प्रत्येक हिंदवासीयाने मदत करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. रा. उपासक यानी आरंभलेल्या कार्यास आज रोजी रु. १ देत आहे. ता. २२–५–२९.

अस्पृश्यांचे सुप्रसिद्ध पुढारी. शिवराम जानबा कांबळे.

आजच्या चढाओढीच्या काळात बऱ्याच संस्था बहिष्कृत वर्गाच्या मुलामुलीस शिक्षण देण्याचे श्रेय घेत आल्या आहेत. सदर प्रमाणे रा. उपा-

सक व श्रीमती लक्ष्मीबाई उपासक हे नव्या जोमाने शिक्षण प्रसाराचे बहु-मोल कार्य हाती घेत आहेत हे पाहून आनंद वाटतो. अशा उपयुक्त कार्यास स्वतः व मित्रमंडळीकडून शक्य ती मदत मिळवून देणे जरूर वाटते. मी स्वतः सदर कार्यास रु. १ मदत म्हणून देत आहे, त्याचा स्वीकार व्हावा.

डि. सी. मिशन ( शिक्षक ) २२-५-२९ धा. वि. गायकवाड.

रा. उपासक यांची योजना मी वाचली. ती निर्दोष आहे. माझ्याकडून व पुणे हिंदुसभेकडूनही यथाशक्ति व यथावकाश मदत होईल. सर्वांनी व सर्व बाजूंनी उठाव केल्यास अशक्यप्राय वाटणारी ही गोष्ट सहजासहजी घडून येईल. २३-५-२९

चिटणीस ' हिंदुसभा ' पुणे शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

महाराष्ट्र-विद्याशाळेसंबंधी शेरे-बुक रा. रा. उपासक यानी दाखविले. त्याजकडून सर्व हकीकत, उद्देश व धोरणं समक्ष समजावून घेण्यास वेळ नव्हता. तथापि, आमचे मित्र रा. माटे यानी हे सर्व समजावून घेतल्याचे आपल्या शेऱ्यात लिहिले आहे. यामुळे मला ते वेगळे समजावून घेण्याचे कारण नाही. व श्री. माटे यांच्या मताचा आधार घेऊन, मी या संस्थेला मजकडून होईल ती मदत करण्यास तयार आहे. अस्पृश्यता-निवारण हे सर्वांनाच इष्ट आहे. पण ते करिताना जातिभेद कमी न होता कित्येक वेळा तो वाढण्यास मदत होते, तसे न झाल्यास हल्लीपेक्षा पुष्कळ अधिक लोक या कार्याला मदत करतील असे मला वाटते. कळावे; २३-५-२९

संपादक ' केसरी ' पुणे. न. चि. केळकर बी. ए. एल्. एल्. बी.

मे० उपासक आणि श्रीमती उपासक यानी योजलेले कार्य त्यांच्या धडाडीला शोभण्यासारखे आहे. अशाप्रकारे जनतेने मिळूनमिसळून स्पृश्या-स्पृश्यतेचे कार्य केल्यास, अखिल हिंदुसमाजाला उज्वल स्वरूप येऊन खरे कार्य होणार आहे. याला हिंदवासीयानी मदत करणे अवश्य आहे. मी,

सरकार्यास दरमहा रु. १ वर्गणी देण्याचे योजिले आहे, त्याचा अंगिकार व्हावा अशी विनंती आहे. २५-५-२९

ऑ. बेंच मॅजिस्ट्रेट, पुणे. आर. एस्. घाटगे (सुभेदार)

या कार्याविषयी माझी पूर्ण सहानुभूती आहे. २५-५-२९

माजी संपादक " जागरूक " वालचंद रामचंद कोठारी, बी. ए.

अस्पृश्यता-निवारणाचे खरे भरीव कार्य अस्पृश्यांची सुधारणा, उन्नती व त्यांचे शिक्षण या गोष्टीवर अवलंबून आहे. श्री. उपासक यांची योजना अशाच प्रकारची म्हणजे अस्पृश्यांचा समाजातील दर्जा वाढविणारी असल्यामुळे तिला सर्वांचा पाठिंबा मिळेल असा मला भरंवसा वाटतो. ता. २७-५-२९

उपसंपादक 'केसरी' पुणे. ग. वि. केतकर, बी. ए. एल. एल. बी.

श्री. द. रं. उपासक यानी आपली 'महाराष्ट्र-विद्याशाळा' या संस्थेसंबंधी योजना दाखविली व ती मला फार पसंत पडली. श्री. उपासक हे जातीने मराठी असून त्यानी महार जातीचे मुलीबरोबर जो मिश्रविवाह केला हे एक व दुसरे 'महाराष्ट्र-विद्याशाळा' स्थापन करण्याच्या योजनेचे हस्तपत्रक त्यानी श्री. लक्ष्मीबाई यांचे सहीनिशी काढणे ह्या दोन गोष्टी अनुकरणीय व देशाचे उन्नतीदर्शक आहेत. अशा तऱ्हेने मिश्रविवाह होऊन अशी मिश्रविवाहित जोडपी ठिकठिकाणी देशकार्यास व समाजकार्यास सुरवात करतील तर हिंदुस्थानचा भाग्योदय फार दूर आहे असे मला वाटत नाही. सर्वांनी त्यांचे कार्यास यथाशक्ति मदत करावी अशी मी शिफारस करतो. ता. २७-५-२९

समता-संघ-कचेरी, गायकवाडवाडा. रा. ब. टिळक.

रा. द. रं. उपासक यानी अस्पृश्यवर्गाच्या सर्वांगिण सुधारणेकरिता म्हणून " महाराष्ट्र-विद्याशाळा " काढण्याची जी योजना तयार केली आहे ती अतिशय जरुरीची असून योग्य आहे. तीजपासून अस्पृश्यांची शैक्षणिक ( सामाजिक ) नैतिक आणि औद्योगिक ( आर्थिक ) बाबीत पुष्कळच सुधारणा होण्यासारखी आहे. अशा वेळी अस्पृश्यांच्या सुधारणेस पोषक अशी

विषयांची निवड करून त्याच्या पूर्ततेकरिता रात्रंदिवस निःस्वार्थ बुद्धिने झटून रा. उपासक आपले कार्य मोठ्या धडाडीने आणि चिकाटीने करतील अशी दृढ आशा आहे. कारण ते जातीने मराठा असून महार मुलीबरोबर मिश्र-विवाह करून जी धडाडी दाखविली, तीजवरून आमची आशा निष्फळ होईल असे वाटत नाही. परंतु कोणतेही कार्य करण्यास पैशाची अतिशय जरूरी असते असे निराळे सांगणे नको. मोठमोठ्या देशभक्तानी जी कामे केली, ती पैशावाचून झालेली नाहीत हे सर्वांस ठाऊकच आहे ! म्हणून या पवित्र कार्यास रा. उपासकाना सर्वत्रानी अवश्य मदत करावी अशी आग्रहाची विनंति करतो. मी हि सध्या रु. १ मदत देऊन मित्रमंडळीकडून मदत मिळवून देण्याची हमी घेतो. ता. २७—५—२९

अस्पृश्यांचे तरुण पुढारी. जे. एस्. रणपिसे.

श्री. द. रं. उपासक...आपले अंगिकृत कार्य पक्ष—भेदावर न करता सर्व पक्षाच्या--सभ्य गृहस्थाच्या साह्याने करणार आहेत. अशाच लोकांची सध्या अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी फार जरूरी आहे...या त्यांच्या प्रयत्नास ( आम्हास ) जी मदत करता येईल ती आम्ही करू. ता. २९--५--२९.

माजी संपादक ‘ मातंगबंधु ’ के. के, सकट.
सेक्रेटरी ‘ मातंग--समाज ’ ता. सा. गायकवाड.

अस्पृश्याकरिता सार्वत्रिक सक्तीचे मोफत शिक्षण व फ्री--वसतीगृहाची योजना केल्याशिवाय त्यांची उन्नती शक्य नांही; ही अडचण दूर करण्यासंबंधी केलेली योजना पाहून मला संतोष होतो ह्या कार्याकरिता शक्य ती मदत करण्यास मी तयार आहे. ता. ३--६--२९

संपादक “ दलितबंधु ” पां. ना. राजभोज.

याशिवाय त्या वेळच्या स्वराज्य, दीनबंधु, ज्ञानसंग्रह पत्रांचे संपादक, अध्यापक : टिळक राष्ट्रीय--पाठशाळा ( श्री० साठे ) श्री. का. गो. पाषाणकर, ल. र. भिडे, बाबुराव फुले इत्यादिंचे अभिप्राय मिळालेले असून केसरी,

मराठी ग्रंथ संग्रहालय ... २१/८/३०

श्रद्धानंद, विजयी मराठा, केवारी, मौज इ० वर्तमानपत्रांनी सहानुभूतिपर उद्गार काढले आहेत.

मुंबई येथे असताना मु॥० शांताक्रूझ येथील श्रीनृसिंह राष्ट्रीय-शाळा आम्हास चालविण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळी, वरील कल्पनेवरच काही अभिप्राय मिळाले होते. तेही पुढे देणे अ--प्रासंगिक होणार नाही म्हणून दिले आहेत :

रा. रा. उपासक यानी स्वत: अंगिकारिलेल्या कार्यासंबंधी सविस्तर माहीति मला समजावून दिली. त्याच्या अंगिकृत कार्यात त्याना यश मिळो असे मी इच्छितो. अस्पृश्यता--निवारण--कार्याचे महत्त्व सध्या सर्वानाच पटू लागले आहे. माझी त्याना पूर्ण सहानुभूती आहे. त्याच्या कार्यात शक्य ती मदत करण्याचे मी रा. उपासक याना आश्वासन दिले आहे. मुंबई, ता. १५-११--२१

सयाजी लक्ष्मण सीलम,

सुप्रसिद्ध म्यु० कौन्सिलर. बी. ए., एल्. एल्. बी.

" श्री० उपासक यानी हाती घेतलेले कार्य फारच वाखाणण्यासारखे आहे. त्याच्या कार्यात ईश्वर त्यास पूर्ण सहाय्य करो अशी त्या परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी त्याच्या कार्यास मदत रु. पाच देत आहे,

श्री. धर्म शिक्षण फंड, मुंबई. निजानंद आत्मानंद स्वामी.

श्री. द० रं० उपासक यानी 'महाराष्ट्र विद्याशाळा' या संस्थेची मूर्त व भावी योजना मला स्पष्ट करून दाखविली. त्याच्या बौद्धिक व औद्योगिक प्रयत्नाने मानीव अस्पृश्यता नष्ट होण्याची सबळ आशा आहे व म्हणून माझा या 'महाराष्ट्र--विद्याशाळे'ला पूर्ण पाठिंबा आहे. हा मानीव व उचनीच भाव संस्काराने म्हणजे बौद्धिक शिक्षणाने नष्ट होईल व उद्योगाच्या जोडीने या उचनीचतेचा भाव सक्रिय बदलेल किंवा नष्टच होईल. गुण कर्म स्वभावाच्या तत्वाला बौद्धिक, औद्योगिक व संस्कारिक शिक्षणाची जरूरी आहे व या विविध उपाययोजनेचा अवलंब श्री. उपासक 'महाराष्ट्र--विद्या-

शाळा' या योगे करणार आहेत, या गोष्टीचा मला आनंद आहे. अशा विधायक प्रयत्नास आर्यसमाजी जनतेकडून सहाय्य मिळवून देण्याचा मी प्रयत्न करीन. शुभं भवतु.

मंत्री, आर्यसमाज, मुंबई. एल्. जे. ओघले.

"मु॥० शांताक्रूझ येथे रा. उपासक यानी चालविलेली शाळा मी पाहिली. या बाबतीत त्यांच्याशी मागासलेल्या वर्गाकरिता काय केले पाहिजे याची चर्चा केली. त्यांची योजना अत्यंत स्पृहणीय आहे. त्यांच्या कार्याने त्याना यश मिळो अशी मी शुभेच्छा करतो.

'काँग्रेस' चे पुढारी, मुंबई. बा. गं. खेर. (सॉलिसीटर)

"रा. उपासक यानी चालविलेली संस्था पाहण्याचा आज मला सुयोग आला. अस्पृश्यवर्गाची उन्नति करणे म्हणजे 'राष्ट्रीय' कामगिरी होय असे माझे मत असल्यामुळे रा. उपासक ह्याजकडून अप्रत्यक्ष राष्ट्राची सेवाच होत आहे. रा. उपासक ह्यांची ओळख होऊन मला जवळ जवळ १६ वर्षे झाली. सुप्रसिद्ध कवि व नाटककार राम गणेश गडकरी ह्यांच्या घरी रा. उपासक हे मला नेहमी भेटत असत. प. वा. गडकरी हे आज जिवंत असते तर रा. उपासक ह्यांनी चालविलेल्या ह्या कार्याचा आढावा पाहून खात्रीने आनंदित झाले असते. रा. उपासक ह्यांचे कार्य म्हणजे प. वा. गडकरी ह्यांच्या सहवासाचे व उपदेशाचे प्रत्यक्ष फळ आहे. असे माझे मत आहे. ईश्वर रा. उपासकाना आपल्या कार्यात पूर्ण यश देवो हे इच्छितो. माझ्याकडून जितकी मदत मिळणे शक्य आहे तितकी देण्याचा मी प्रयत्न करीनच.

उपाध्यक्ष हिंदुमहासभा, माटुंगा, (मुंबई) भालचंद्र वामन धडफळे

पूर्वी योजिलेल्या कल्पनेप्रमाणे मु॥० दापोडी व बोपोडी येथे, अनुक्रमे 'महाराष्ट्र-विद्याशाळा' (बौद्धिक व औद्योगिक पाठशाळा) व 'मातृगृह' (निराश्रित मुलामुलींकरिता आश्रय-स्थान) या कार्यास प्रारंभ करण्यात येत आहे तरी उदार व सहृदय अंतःकरणाचे बंधु-भगिनी, शक्य तो मदत करून आमच्या खऱ्याखुऱ्या कार्यास मदत केल्याचे श्रेय घेतील अशी आशा आहे.

मु॥० बोपोडी. दत्ताराम रङ्गनाथ उपासक
पुणे नं- ३ लक्ष्मीबाई दत्ताराम उपासक

## दृष्टीमुळेच सृष्टि !

आयुष्य समाधानकारक घालविण्यासाठी नजर साफ असावी लागते. कोणत्याहि कारणामुळे तुमच्या डोळ्यास त्रास होत असेल तर सर्वांच्या खात्रीचे आणि विश्वासू

# चष्म्यांचे व्यापारी

# आर. एन्. शिंदे अँड सन्स

यांच्या येथे, डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरकडून डोळे

**मोफत तपासून घ्या !**

**उत्तम माल व माफक दर !**

पत्ता:—

आर. एन्. शिंदे अँड सन्स, २०७ गिरगावरोड, मुंबई.

शाखा:—

१ चामारबाग, पोयबावडी २ रानडे रोड, दादर

३ शिवाजीचौक, कल्याण.

॥ ओम ॥

यूरोप, अरबस्थान, आफ्रिका

इत्यादि मोठमोठ्या देशात फिरून अनुभव घेतलेल्या

विठ्ठलदास कालीदास

यांचे

लोक-सेवा

हेअर कटिंग सलून

दगडू हलवाई यांचे दत्तमंदिराजवळ.

शुक्रवार पेठ, पुणे सिटी.

गिऱ्हाइकांचा संतोष हाच आमचा फायदा

चालू दरात स्कीम—पॉपिया लोशन, कामिनिया ऑईल,
फुलदणाणा हेअर ऑईल, भुतनाथ वगैरे अनेक
प्रकारची उंची सुगंधी तेले आम्ही वापरतो.
याचा निराळा चार्ज केला जात
नाही. एक वेळ भेट देऊन
खात्री करून घ्या.

कूपन-सिस्टीम ठेविली आहे